
# दिवस न् दिवस 'कैलास-मानस'च्या वाटेवरचा

सौ. सुमती फडके

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू. प्रवास
सं. क्र. ७८९



REFBK-0028045

# दिवस न् दिवस
# 'कैलास-मानस'च्या वाटेवरचा

सौ. सुमती फडके

REFBK-0028045

केशव भिकाजी ढवळे, मुंबई - ४०० ००४.

- दिवस न् दिवस 'कैलास-मानस'च्या वाटेवरचा

- प्रकाशन क्रमांक १०१२


- स्वामित्वाधिकार

  सौ. सुमती फडके

  'वेस्ट-व्ह्यू', हिन्दु कॉलनी,

  नौपाडा, ठाणे-४०० ६०२.


- पहिली आवृत्ती

  २५ जून १९९५

- मुखपृष्ठ

  विकास फडके, ठाणे

- छायाचित्रे

  वासुदेव फडके

- संगणकीय अक्षरजुळणी

  अक्षय फोटोटाइपसेटर्स, ठाणे.

- मुद्रक

  प्र. पु. भागवत

  ,मौज प्रिंटिंग ब्यूरो,

  गिरगाव, मुंबई-४०० ००४.

- प्रकाशक

  ज्योती धनंजय ढवळे

  केशव भिकाजी ढवळे

  पहिली भटवाडी,

  गिरगाव, मुंबई-४०० ००४

- किंमत २५ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मु-प्रवास ७२१
२८०५५
१५/७/०५
शाखा (स्थळ प्रत)

॥ श्री ॥

लहानपणी आम्ही सागरगोटे,
कवड्या किंवा तत्सम खेळ खेळताना –
देव, धर्म, कर्म म्हणून पहिला डाव देवाला,
दुसरा धर्माला आणि तिसरा कर्माला देत असू.
कोणत्याही पहिल्या-वहिल्या गोष्टीचं एक अप्रूप असतं.
जसं पहिलं फूल, पहिलं मूल!
कथा, लेख वगैरेंचं माझं लिखाण
निरनिराळ्या ठिकाणी प्रसिद्ध झालं.
पुस्तकरूपानं प्रसिद्ध होणारं हे पहिलं लिखाण.
विश्वधर्म असलेला माझा आर्यधर्म
अखिल अचेतन-सचेतन सृष्टीत
देव असल्याची शिकवण देतो.
म्हणूनच प्रत्येकात असलेल्या देवाला म्हणजेच
जनता-जनार्दनाला
हे पुस्तकरूपी पहिलं लेखनपुष्प अर्पण!

# थोडं अंतरीचं

आपला आनंद नेहमी सगळ्यांना वाटून टाकायचा, ही एक माझी सवय आणि आवड. काही विशेष गोष्टीतले अनुभवानंद तर, कार्यक्रमाच्या रूपांनी अनेकांना भरभरून द्यायची हौस. म्हणूनच पंढरपूरची वारी पायी करून आल्यावर मनात आलं, नामदेवांनी ज्ञानेशांची – 'एक तरी ओवी अनुभवावी' असं म्हटलं असलं तरी ओवी अनुभवणं हे काही सहज, सोपं किंवा येऱ्यागबाळ्याचं काम नाही. ती ओवी पाठ करणं, म्हणून दाखवणं, फार तर अर्थ उलगडून सांगणं हे एक वेळ करता येईल, पण प्रत्यक्ष जीवनात तिचा अनुभव घेणं म्हणजेच तसं आचरण करणं. त्याला तितकीच पात्रता यायला हवी. एक प्रकारची तपश्चर्याच की! मग त्या मानानं, 'एक तरी वारी अनुभवावी' हे एक वेळ शक्य. आणि म्हणून मी, ती अनेकांनी अनुभवावी – प्रत्यक्षात किंवा माझ्या अनुभवकथनाच्या कार्यक्रमांतून, यासाठी ते कार्यक्रम सुरू केले. आणि अनेकांना तो आनंद वाटला.

अयोध्येला राममंदिराच्या सेवेला जाऊन आल्यावरसुद्धा अनेकांच्या आग्रहाखातर, तोही अनुभवानंद कार्यक्रमातून लुटला. संक्रान्तीला वस्तू लुटतो ना तसा! अनेकांना खूष केलं.

मग जेव्हा, आपली पवित्र तीर्थक्षेत्र 'कैलास-मानस' येथील अद्भूतरमम्य विस्मयकारक, खडतर आणि साहसी यात्रा यशस्वी केली, तेव्हां तिथला निसर्ग-खजिना कार्यक्रमांतून जरी भरभरून देत सुटले, विलक्षण अनुभवानंद मनाच्या गाभाऱ्यांतून, हातचा न ठेवतां उलगडत राहिले, तरीसुद्धा मनात आलं की, ही खडतर यात्रा, कुणाला सहज करता येण्यासारखी नाही. मुख्य म्हणजे यासाठी तन्दुरुस्त आरोग्य हवे. अधिकात अधिक लोकांपर्यंत हा यात्रेचा अनुभव, आनंद पोचवायचा असेल तर, तो शब्दबद्ध करून, ईटुकल्या का होईना, पण पुस्तकरूपांत ठेवला तर पुष्कळजण त्याचा फायदा घेऊं शकतील. म्हणून मग त्याकडे वळले.

पण वळले तरी, पुढची सगळी कार्यवाही हवी नां? सुदैवाने ज्योतीताई ढवळेना लिखाण आवडलं आणि त्यांनी सगळं मनावर घेतलं. मला त्यातलं

'ओ' की 'ठो' माहीत नव्हतं. माझी त्यांची या निमित्तानं ओळख न होता 'मैत्री'च झाली. आणि प्रकाशन समारंभापर्यंत सर्व कार्यभार त्यांनी वाहिला. त्यातली निरनिराळी कामं पाहणारे, सर्वजण 'सुहृद'च झाले. म्हणून आभार न मानता, ज्योतीताई, दिवाकर घैसास, अरुण फडके, दीपक फडके, विकास फडके, (ही तिघे तर 'फडके' म्हणजे माझेच कुटुंबीय की!) आणि प्रस्तावना देण्याऱ्या प्रिय वसुंधरा पेंडसेनाईक, आणि ह्या पुस्तकासाठी काही खास चांगले फोटो पाठवणारा, 'कैलास-मानस' यात्रेतला श्रावणबाळासारखी आमची काळजी करणारा, तरुण सहयात्री, बिपिन सांघी, ह्या सर्वांचं प्रेमऋण मी माथ्यावर मिरवणार आहे. सगळीच ऋणं काही फेडायची नसतात.

सौ. सुमती फडके

# प्रकाशकाची प्रस्तावना

सौ. सुमती फडके यांचे 'दिवस न् दिवस कैलास-मानसच्या वाटेवर' हे पुस्तक प्रसिद्ध करताना एक वेगळाच आनंद वाटत आहे. पुष्कळदा प्रवास-वर्णन हे रुक्ष असते, क्वचित् प्रसंगी पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' अशा किंवा 'जावे त्यांच्या देशा' या पुस्तकांप्रमाणे विनोदाला प्राधान्य देणारेही असते, तर कधी ते 'झेपावे दक्षिणेकडे' या सौ. मुक्ता केणेकर यांच्या दक्षिणेतील प्रवास-वर्णनाप्रमाणे तीर्थक्षेत्रांच्या तपशिलाबरोबरच वैयक्तिक नितांत श्रद्धेचे दर्शन घडविणारे असते. उत्तम प्रवास-वर्णनाचे एक गमक म्हणजे वाचकाला आपण लेखकाबरोबरच प्रवास करीत आहोत असे वाटले पाहिजे. सौ. सुमती फडके यांच्या या प्रवास-वर्णनात तपशील आहे, श्रद्धा आहे, विनोद आहे, प्रत्ययकारिता आहे आणि त्याचबरोबर त्यांच्या स्वत:च्या जिद्दीचे, आंतरिक घालमेलीचे, कौटुंबिक जिव्हाळ्याचे आणि विशाल निसर्गाच्या दिव्य स्वरूपाशी तादात्म्य पावणाऱ्या संवेदनक्षमतेचे उत्तम दर्शनही आहे.

हे वर्णन वाचताना कित्येक प्रसंगी मन हेलावून जाईल, हळवे होईल, चकित होईल आणि भावमधुर ऋणानुबंधांच्या दर्शनाने डोळ्यात अश्रूही उभे राहतील. उत्तम शब्दचित्राला छायाचित्रांची जोड देऊन हे पुस्तक चित्तवेधक केले आहे. पर्यटकांना केवळ भौगोलिक व ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारी पुस्तके असतात तसे हे पुस्तक चाकोरीबद्ध होणार नाही याची नकळत काळजी घेतली गेली आहे. अनुभव कथनाचे कार्यक्रम करून हे प्रवास-वर्णन सौ. सुमती फडके अतिशय आकर्षक रीतीने श्रोत्यांना सादर करतात हे एक आणखी वैशिष्ट्य उल्लेखनीय आहे.

अत्यंत अवघड व आव्हानात्मक अशा या तीर्थयात्रेचे वर्णन वाचकांना आवडेल याची खात्री वाटते. आमच्या प्रकाशनांच्या विविधतेत ही एक आगळीच भर आहे.

ज्योती धनंजय ढवळे

२५/६/९५

**प्रकाशिका**

# 'मानस'

कैलासपर्वतावरच्या 'मानस' सरोवराचे दर्शन डोळे निवतील इतके मनसोक्त घेऊन तो अलौकिक अनुभव मनाच्या कुपीत सदैव जपून ठेवणे हे असंख्य भारतीयांचे स्वप्न असले, तरी ते प्रत्यक्षात उतरवण्याचे भाग्य फारच थोड्यांना लाभते. अत्यंत खडतर अशी ही यात्रा पूर्ण करून येणारे भाग्यवंत इतरांच्या केवळ आदरालाच नव्हे तर सात्त्विक हेव्यालाही पात्र होतात. ('कैलास' हे भारतीय पूर्वापार अंतिम ध्येय असावे. त्यामुळे ते साध्य न होताच इहलोकीची यात्रा संपविणाऱ्याच्या जिवाला, निदान मरणोत्तर तरी समाधान लाभावे म्हणून 'कैलासवासी' म्हणण्याची प्रथा पडली असेल का?) अशा भाग्यवंतांपैकी सौ. सुमती फडके या एक आहेत. त्यातही पुन्हा पतिपत्नींनी एकत्रितपणे कैलासयात्रा पार पाडल्याची उदाहरणे तर फारच विरळ.

उत्तम रीतीने कसे जगावे हे सर्वांनाच समजते असे नाही. जीवनाला सुंदर आणि समृद्ध करण्याची वृत्ती उपजतच असावी लागते. पालकांचा दृष्टिकोन, संस्कार आणि भोवतालचे सुयोग्य वातावरण यामुळे ती सर्वांगाने बहरते, विकसित होते परंतु मुळातच नसली तर निर्माण मात्र करता येत नाही. त्याचबरोबर हेही खरे की आईवडिलांकडून हा वारसा मुलांकडे – बहुधा गुणसूत्रातूनच येत असावा. म्हणूनच काही कुटुंबात पिढ्यान् पिढ्या उत्तम जगण्याचा वारसा चालत आलेला दिसतो. त्यालाच 'खानदानी' वागणे म्हणत असावेत. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा मनाच्या श्रीमंतीशी ही 'खानदानी' निगडित असते. अशा मनाने श्रीमंत असणाऱ्या मंडळींमध्ये मी सुमती फडके यांचा समावेश जरूर करते. खरे तर त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाविषयी मी लिहावे हे अपेक्षित असताना मी सुमती फडके या व्यक्तीविषयी का लिहिते आहे? कारण त्यांच्या मनाची श्रीमंती हे या प्रवासवर्णनाचेही वैशिष्ट्य आहे, अगदी पदोपदी जाणवणारे.

जीवनातील नाविन्याला सतत दाद देण्याची प्रवृत्ती आणि धाडसी वृत्ती यामुळेच सुमतीबाईंनी कैलासयात्रेचे आव्हान स्वीकारले आणि पेलूनही दाखविले. तिथेच न थांबता या यात्रेची 'व्हिडिओ कॅसेट' मनात जपून परत आणली आणि आता ती पुस्तकरूपाने वाचकांपुढे ठेवली आहे. त्यामुळे हे प्रवासवर्णन वाचताना आपण प्रत्यक्षच कैलासयात्रा करतो आहोत असा अनुभव येत राहातो. प्रवासाला निघताना काय साहित्य बरोबर घ्यायला हवे, किती वेळा 'मेडिकल चेकअप्स' करून घ्यावे लागतात, दिल्लीला कुठेकुठे

खेटे घालावे लागतात वगैरे तपशील इथे मिळत असला तरी तो रटाळपणे पुढे येत नाही याचे श्रेय सुमतीबाईच्या ओघवत्या शैलीला आणि सतत व्यक्त होणाऱ्या कृतज्ञतेच्या भावनेला द्यायला हवे. दुसऱ्याचा विचार सदैव करण्याचा त्यांचा दृष्टिकोन या लेखनातून सारखा जाणवत राहतो. म्हणूनच सारे प्रवासवर्णनच अतिशय सहृदयतेने प्रकट झाले आहे. साधी, सरळ परंतु रसाळ भाषा हे या लेखनाचे एक नजरेत भरणारे वैशिष्ट्य आहे. ओढूनताणून काव्यमय लिहिण्याच्या भरीला सुमतीबाई पडलेल्या नाहीत. मात्र जिथे काव्यमयता आढळते तिथे ती उत्स्फूर्तपणे आणि अत्यंत स्वाभाविकपणे व्यक्त झाली आहे. 'सिमखोला'हून पुढे 'माल्या'ला जातांना दिसलेल्या निळ्या-कोनफळी रंगांच्या असंख्य छटा असोत की 'माल्या'ला संध्याकाळी हाकेच्या अंतरावरून पहाडातून उगवणारा चन्द्र असो, 'बुधी'कडे जाताना रौद्र रूप धारण केलेली नदी असो की 'आयुष्याचे सार्थक झाले' हा अलौकिक अनुभव देणाऱ्या मानस सरोवराचे दर्शन असो, 'तारचेन'ला पाहिलेल्या 'बर्फाच्या मोत्यां'चा पाऊस असो की 'खरैनी'च्या पुढल्या प्रवासात मध्यरात्री केलेली जीवघेणी पायपीट असो, प्रत्येक वेळी व्यक्त होणारी काव्यमयता त्या प्रसंगाशी एकजीव झाली आहे. एखादीच समर्पक उपमा, एखादीच काव्यमय कल्पना, मूळचे वर्णन खुलवून जाते. मोजक्याच अलंकारांनी एखाद्या सुंदरीच्या सौंदर्याला उठाव द्यावा तशी!

सुमतीबाईंना नाविन्याची ओढ आहे, केवळ हव्यास नाही, म्हणूनच त्या नाविन्यात औचित्य दिसते. 'मानस' सरोवरातील पाणी सर्वांना तीर्थ म्हणून देण्यासाठी यात्रेकरू नेहमीच बरोबर आणत असतील पण ठाण्याहून जातानाच सोबत चांदीची 'बिल्वपत्रे'करून घ्यायची आणि 'मानस' सरोवरात सुस्नात करून 'कैलासा'ला वाहून, निर्माल्य म्हणून परत आणायची आणि सर्व आप्तस्वकीयांना 'प्रसाद' म्हणून द्यायची ही कल्पनाच किती हृद्य आहे! यात केवळ नाविन्य नाही, मनात दाटलेले आप्तस्वकीयांबद्दचे अलोट प्रेम आहे. सर्वोच्च आनंदाचा अनुभव घेताना 'आपल्या' माणसांची आठवण मनात दाटून ज्यांचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबतात, तीच खरी श्रीमंत, संपन्न, समृद्ध माणसे! कारण जीवन त्यांना कळलेले असते. सुमतीबाईंची ही श्रीमंती सदैव वाढत राहावी, इतरांमध्ये वाटली जावी आणि सहृदय लेखनाच्या रूपाने अधिकाधिक पुस्तकांमधून वाचकांपर्यंत पोहचावी, ही मन:पूर्वक सदिच्छा.

वसुंधरा पेंडसेनाईक

# माहिती

आपली पवित्र तीर्थक्षेत्रे 'कैलास' आणि 'मानस!' चीनने इ. स. १९५९ नंतर तिबेट पादाक्रान्त केल्यानंतर, ह्या तीर्थक्षेत्रांच्या यात्रा बंद झाल्या. चीनशी त्यावद्दल वाटाघाटी केल्यावर, १९८१ पासून या यात्रांना परवानगी मिळाली. साधारण साडेचारशे यात्रेकरू याला जाऊ शकतात. ही यात्रा सरकातर्फेच होत असते. त्यासाठी आपल्याजवळ पासपोर्ट असावा लागतो. व्हिसा सरकारतर्फे मिळतो.

१४ जून ते २४ सप्टेंबर या काळात, साधारण एकेक आठवड्याने, बत्तीस जणांचा गट एका वेळी सरकार नेते. याबद्दलची जाहीरात फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून, मार्चच्या एक दोन आठवड्यापर्यंत, वर्तमानपत्रांतून, रेडिओवरून किंवा दूरदर्शनवरून येते असते. त्यानुसार आपण आपले अर्ज, वैद्यकीय दाखल्यांसह पाठवायचे. हा दाखला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याचा असावा लागतो.

त्यानंतर परराष्ट्र खात्यातर्फे यात्रेकरूंची निवड करण्यात येते व तारेनें निवड झाल्याचे कळवतात. निवडीचा स्वीकार केला असल्यास आपण त्यांना लगेच तारेनेच कळवायचे असते. व सोबत 'कुमाँऊ विकास निगम'च्या नांवाने रु. ५००चा डीमांड ड्राफ्ट पाठवायचा. यानंतर पुन्हां तुमची वैद्यकीय तपासणी दिल्लीला सरकारतर्फे होणार असते. हे काम परराष्ट्र खात्यातर्फे होते. ही तपासणी खुद्द यात्रेच्या आधी पाच दिवस होते. त्यावेळी आपले शारीरिक तपासणी अहवाल (आपल्या खाजगी डॉ. कडून करून घेतलेले) बरोबर न्यायचे असतात. रक्त, शौच, लघवी, छातीचा एक्सरे, स्ट्रेस टेस्ट एवढे दाखले व पासपोर्ट घेऊन दिल्ली गाठायची. त्याआधी यात्रेचे एक पूर्ण माहितीपत्रक आपल्याला येते. त्याप्रमाणे तयारी घ्यायची आणि अखेर दिल्लीच्या कडक वैद्यकीय तपासणीनंतर (लष्कराच्या हॉस्पिटलमध्येही तपासणी होते.) तुम्ही लायक ठरलात, की हिमालयाकडे कूच करता येतं.

या यात्रेचा खर्च, आमच्या वेळी म्हणजे १९९३ मध्ये रुपये तीस हजार माणशी होता. आता चार साडेचार हजारांनी वाढला असल्याचे कळते. निवडीनंतर, यात्रेकरूंमधून एक फूड कमिटी नेमतात व चीनमधे सहा दिवस जेवण्याची व्यवस्था नसल्यानें, त्यासाठी लागणारी सामानाची व खाद्यपदार्थांची खरेदी करण्यासाठी, माणशी रु. तीनशे भरावे लागतात. त्याचदिवशी 'कुमाँऊ विकास निगम'ला भारतातील व्यवस्थेचे, प्रत्येकी रु. ४५००- रोख द्यावे लागतात. त्यानंतरच्या दिवशी स्टेट बँकेत बोलावून, व्हिसा व चीनमधल्या प्रवेशासाठी ५५० डॉलर्स हे परकीय चलन प्रत्येकाला दिले जाते. यातले चीन सरकारला, तिथे गेल्यावर ४०० डॉलर्स द्यायचे व आपल्या खर्चासाठी १५० डॉलर्स ठेवायचे. त्यानंतरच्या उरलेल्या गरजेच्या खरेदीसाठीं दोन दिवस असतात.

हिमालयातल्या हवेच्या दृष्टीने खालील गोष्टी आवश्यक –

१) विन्ड प्रुफ जॅकेट – ज्याला आतून 'फर' लावलेली असते.

२) एक लांब अर्ध्या बाह्यांचा स्वेटर व दोन लांब बाह्यांचे स्वेटर

३) माकडटोपी
४) लोकरीच्या हातमोजांचे दोन जोड
५) 'लॉंग जोन्स'च्या दोन जोड्या
६) लोकरीच्या पायमोजांचे चार जोड
७) सुती पायमोजांचे चार जोड
८) जीन्स किंवा पॅन्ट्स् ३
९) टी शर्टस् ४
१०) साखळी असलेले गॉगल्स,
११) हंटर किंवा ट्रेकिंग शूज
१२) गवताची टोपी किंवा पीक्ड कॅप
१३) वाटर बॉटल
१४) बॅटरी – तिच्याबरोबर सेल्सेचे २ जोड व एक जादा बल्ब
१५) रेनकोट
१६) कॅमेरा, पैसे, महत्त्वाचे कागद ठेवण्यासाठी बेल्ट पाउच
१७) सहा फूट लांब व तीन फूट रूंद असे प्लॅस्टीक
१८) चमचा, बशी व मोठी वाटी
१९) टॉयलेट पेपरचे दोन रोल

आपले सामान खेचरांवरून जाते. चेन असलेल्या कॅनव्हास् बॅग्ज् सामानासाठी घ्याव्या, कारण या टिकाऊ व हलक्या असतात.

ज्याला त्याला नेहमी लागणारी औषधे, गोळ्या घ्याव्या. आपल्याला चालणारे कोल्ड क्रीम, पेट्रोलियम जेली घ्यावी. तसेच व्हिक्स व्हेपोरब किंवा व्हिक्स इनहेलर, व्हिटॅमिन सी, बी कॉम्प्लेक्सच्या गोळ्या. स्ट्रेपसिल, अनाल्जिन किंवा हॉलस् यापैकी कोणत्याही गोळ्या, डायजिन टॅबलेटस्, कामपोझ टॅबलेटस्, क्लोरोस्ट्रेप कॅपसूलस् यासारखी औषधे घ्यावीत. ही सर्व लागतातच असे नाही पण काळजी घेण्याच्या दृष्टीने जवळ असावीत.

प्रत्येकाच्या सामानाचे वजन २५ कि.पर्यंत असावे. थोडे जास्त झाल्यास, जास्त पैसे द्यावे लागतात. आपल्या हद्दीतील सर्व राहण्या-जेवणाची व्यवस्था व मार्गदर्शन 'कुमॉऊ विकास निगम' करते.

अशी ही भव्य-दिव्य, अत्यंत अवघड, साहसी व जिद्दीची हिमालयातली खडतर यात्रा आहे. एक तऱ्हेची तपश्चर्याच म्हणा ना! पण या परिसरात माणसाचं मन निरामय होतं. निसर्गाच्या विस्मयकारी स्वरूपाचा आणि प्रसन्न वातावरणाचा मनावर काही वेगळाच परीणाम होतो. तो सुखदायी आणि निर्लेप असतो.

# अनुक्रमणिका


१. ।ॐ नमः शिवाय। ........ १३

२. राजधानीत ........ २२

३. यात्रा सुरू ........ २७

४. विलोभनीय विस्मयकारक वैभव ........ ३२

५. आव्हाने आणि अनुसंधाने ........ ३७

६. हिरवी हुरहूर आणि हिमालय ........ ४०

७. लंघन आणि सीमोल्लंघन ........ ४४

८. मंजिल की ओर! ........ ४७

९. शरण तुला भगवंता ........ ५१

१०. शेपटावर निभावलं ........ ५५

११. सुस्नात होय जग! ........ ५८

१२. डोळ्यांचे पारणे फिटले ........ ६०

१३. सौंदर्याचे निरोप घेतां... ........ ६३

१४. मेरी प्यारी जन्मभूमी ........ ७०



फडके दांपत्याची प्रवासाची सुरुवात



कैलास पर्वत



'मालपा'च्या वाटेवर
(सर्वात शेवटी लेखिका)



मानस सरोवरातील स्नानानंतर
लेखिका सौ. सुमती फडके



पौर्णिमेच्या चंद्राचं मानस सरोवरातील प्रतिबिंब

**तयारीच तयारी**

श्रावणातला तो दुसरा सोमवार होता. 'सुर-वाणी'तल्या दामले बाईंकडून रुद्राची एकादष्णी करून जवळजवळ दोनला समाधानात घरी आले. आम्हा बायकांचा रुद्र एकादष्णीचा तो पहिलाच प्रयोग यशस्वी झाला होता. आम्ही सातजणी होतो.

**तारा आल्या !**

घराच्या दारात पाऊल टाकलं. "अरे, दार सताड उघडं कसं ? मी आल्याची देखील ह्यांना काही चाहूल नाही. आत शिरले तर 'हे' काहीतरी टपाल वाचण्यात दंग होते. माझ्या येण्याकडेसुद्धा लक्ष नाही. "पत्र आलंय का ? कुणाचं ?" मी उत्सुकतेनं म्हटलं आणि ह्यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद बोलण्यातून ओसंडत होता. "अग, तारा आल्यायत् कैलास-मानसच्या !" अधीरतेने मी, "दोघांना ?" "हो, ह्या काय ? आणि अग एकाच बॅचला" हे. माझा विश्वासच बसेना. एकदम धाडकन् काहीतरी अंगावर आल्यासारखं वाटलं. आम्ही दोघांनी एकमेकांना टाळी दिली. कारण वीस ते चोवीस जुलैपर्यंत चातकासारखी वाट पाहून पाहून, यंदा नाहीच आपली निवड झाली, अशी समजूत झाली होती आणि निराशाच पदरी पडली होती. वाटलं होतं -आपण वयस्क म्हणून ? की अर्जच उशीरा पोचले असतील ? कारण घामटा निघेपर्यंत त्या सिव्हिल हॉस्पिटलच्या फेऱ्या, फिटनेस सर्टिफिकेट मिळेपर्यंत दम निघून, अगदी शेवटच्या दिवशीच अर्ज गेला होता. महिनाभर आधी कळवतात असं समजलं होतं. त्यामुळे ती तारीख निघून गेली होती. कारण शेवटची बॅच चोवीस ऑगस्टला निघणार म्हणजे कमीत कमी चोवीस जुलैला पत्र येणार होतं.

अशी आशा सोडून दिल्यानंतर आलेलं हे बोलावणं— झालेली निवड— तीही दोघांची— तीही एकाच बॅचला— खरंच सांगते, खूप आनंद झाला. तरी एक प्रकारची धडकीपण भरली. हे बोलावणं स्वीकारावं की नाही ? कारण निघायला अवधी इतका थोडा ठेवलाय् की, मानसिक तयारी आधीपासून झालेली असली तरी कायिक तयारी करायला काही वेळच राहिला नव्हता.

## बुटांपासून सरावाला सुरुवात

विशेषत: महिनाभर मी बूट घालून चालण्याची तालीम करणार होते. इतकं कशाला, पायमोजे आणि बूट घालायलाही शिकायचं होतं मला. शिवाय रोज आमच्या ठाण्याजवळच्या येऊरच्या डोंगरावर फिरायला जाणार होतो आम्ही. आता जायचं ठरवायचं तर, खरोखर कशालाच वेळ नाही, तर तालीम कसली? कारण अवघ्या नऊच दिवसांनी इथून निघायला हवंय् दिल्लीला. कारण १३ तारखेला मेडिकलला बोलावलंय्.

काय करावं काही समजेना. सारखी दोघांच्या मनाची आंदोलनं चालू होती. असा धडकी भरलेला आनंद, मनाची विचित्र अवस्था पहिल्यांदाच अनुभवत होतो आम्ही. आनंदात कधी धडकी असू शकते का? काय करावं?

झालं होतं काय, अर्ज केल्यापासूनच्या मधल्या काळात, मनाचे इतके चढउतार झाले होते! कुणी कुणी, काय काय, वेगवेगळं सांगायचं, कुणी प्रेरणा द्यायचं. कुणी 'वा! शाबास आहे बुवा तुमची-तुमच्या उत्साहाची-धडाडीची' म्हणायचं. तर कुणी "ती यात्रा फार कठीण आहे– ह्या वयात सोसेल ना? विचार करा हो! तिथली मनमानी बदलणारी हवा, हिमवादळं, थंडी, खाण्याचे हाल", याचंच कुणी वर्णन करायचं, तर काहीजण "काही नाही हो – बिनधास्त जा, अहो, तुम्ही वारी करता, गिरनार चढलायत् नुकताच; रायगड, कनकेश्वर, गोमुख, यमनोत्री पायी केलीत् -- जा सरळ;" असं म्हणायचं. अशा सांगण्यात माझ्या मुलामुलींचा, सुनांचा पुढाकार असायचा. पण त्याचवेळी त्यांच्या अंतरातल्या, अगदी आंतल्या कप्प्यातली कालवाकालव, आणि काळजीपण मला जाणवायची.

## शुभ बोल...

एक सुशिक्षित बाई मात्र अजबच भेटली. सुशिक्षितांचा अशिक्षितपणा तिनं दाखवून दिला. नुसता अर्ज केलाय् म्हटल्यावर तिनं काय सांगावं? "बाप रे, या वयाला तुम्ही जाताय्? माझ्या ओळखीची एक बाई– त्या हवेत गारठली– म्हणजे गेलीच– म्हणजे वारली."– बाप रे! पहिल्याच फटक्याला हे सांगून तिनं अडाणीपणाच नाही का दाखवला? थोडं तारतम्य बाळगावं की नाही? खरं सांगते, मन चरकलंच हे ऐकल्यावर– आणि मग कचरलं सुद्धा जरासं!

## हसत निरोप द्या

मग मात्र विचारान्ती वाटलं, जे विधिलिखित आहे, ते कधीही चुकत नाही. शिवाय आपला गृहस्थाश्रम संपून, आता आपण वानप्रस्थाश्रमात आहोत.

त्यामुळे आपण कशाला तो विचार करायचा? आपली तर आनंदानं तयारी आहे त्याही गोष्टीला. परवापरवाच, नुकतंनुकतंच, संधी मिळत गेली, तसंतसं, जावई-मुलांना-सुनांना, लतामावशी, नलूमावशी, शरददादा, अरूकाका-पुष्पाकाकूला— आपण नाही का सांगितलं, की शेवटच्या क्षणी आम्हाला हसत निरोप द्यायचा! छान धूप-उदबत्त्या लावायच्या— जोत्स्ना भोळेची 'बोला अमृत बोला' सारखी गाणी म्हणायची, अगदी सनईच्या सुरात आम्हाला निरोप द्यायचा. मात्र चारी मुलांनी— (संजीव-दिलीप आणि मानसपुत्र अनिल-अभय) ह्यांनी काही अंतरापर्यंत खांदा द्यायचा— मग हवी तर हर्स वगैरे! पण सगळ्यांनी आनंदात मिरवणूक काढायची— निरोप देताना! असो!

हे आपलं या निमित्तानं सगळ्यांनाच सांगून टाकलं बरं का!

तर काय म्हणत होते, की— जावं की नाही अशा संमिश्र विचारात— वाशीकरांना गोरेगावला फोन लावला. या यात्रेचं मार्गदर्शन करणारे हे सज्जन गृहस्थ. ते म्हणाले, आता उशीरा तर उशीरा— अहो गव्हर्नमेन्टचा कारभार— समजून घ्यायचा. पहिलं तुम्ही दिल्लीचं रिझर्व्हेशन करा. मग ठरवा जायचं की नाही ते! नाही ठरलं तर रिझर्व्हेशन रद्द करता येईल. पण उशीर झाला तर तेच मिळणार मात्र नाही. मग आम्हाला ते पटलं. लगेच दोघेजण, भर पावसात गाडीचं आरक्षण करायला निघालो. मी तर अक्षरश: अजून पायातली चप्पलही काढली नव्हती. 'आल्या पावली' म्हणतात ना, तशी मी निघाले.

पावसाचेसुद्धा किती प्रकार, नाही का? धडाडून कोसळणारा— वादळवाऱ्यासह घोंगावत येणारा— रिमझिम पडणारा— विजेच्या लखलखाटांनी घाबरवणारा— आणि रडतराऊसारखा चिरचिरत— चिकचिकाट करत पडणारा! अशा चिकचिक पावसात मग मनाचीसुद्धा घालमेल होते, नाही? तशा पावसात आम्ही निघालो. ठाण्यातलं अलीकडे नव्यानं झालेलं आरक्षण व्यवस्थेचं ठिकाण मात्र छान आहे. मला खूप आवडतं ते! अकरा तारखेच्या बुधवारचं, पश्चिम एक्सप्रेस्चं, सकाळी अकरावीसला सुटणाऱ्या त्या गाडीचं आरक्षण केलं, नी तसेच लेकीकडे— अंजनीकडे गेलो. 'बलराम'पण होते. म्हणजे माझे जावई; त्यांना ही बातमी सांगितली. लगेच उजळलेल्या चेहेऱ्यानं दोघं म्हणाले, "वा! छान! लकी आहात खरंच! जा जा - तयारीला लागा." किती बरं वाटलं म्हणून सांगू? लगेचच दिलीपकडे 'कळव्या'ला जावंसं वाटलं, तोच त्यातल्या त्यात दूर! संजीव-नीलाला आणि पुष्पाकाकूला घरनं निघतानाच सांगितलं होतं.

पण नारळीपौर्णिमा असल्यानं दिलीपच ठाण्यात सर्वांना घेऊन येणार होता, म्हणून तिथेच थांबलो. आणि त्याप्रमाणे आलाच तो! त्यानंही उत्साह दिला. आणि मग आलेली संधी न दवडण्याचा निश्चय केला.

**शंकरा! आम्ही येतोय बरं!**

श्रावणी सोमवारचा उपास सोडताना म्हटलं, "शंकरा, दोन्ही सोमवारी, रुद्र म्हणताना, नाहीतरी, तुझ्या निवासात– पार्वतीनं ज्या हिमालयात तुझ्यासाठी घोर तपश्चर्या केली, तिथं– बोलाव की रे आम्हाला" अशी विनवणी तुला केली होती. एखाद्यानं अगत्यानं बोलावलं, प्रेमानं 'या' म्हटलं, की बरं वाटतं ना जायला? तुझी कृपा असली तर येणं होईल. आणि खरंच की रे आज तू माझं म्हणणं ऐकलंस. निघतोय् बरं का आम्ही! आता पुढचंही सर्व यशस्वी करणं तुझ्याच हातात. प्रयत्न आमचा, इच्छाशक्ती आमची."

आणि खरोखरच अक्षरश: युद्धपातळीवर जणू, पुढच्या तयारीला आम्ही लागलो; नव्हे लागावं लागलं. कारण अवघे आठ दिवसच हातात होते. त्यांच्या सूचनेप्रमाणे बऱ्याच खरेद्या करायच्या होत्या आणि मुख्य म्हणजे पुन्हा सगळे मेडिकल रिपोर्टस् जमवायचे होते. त्यामुळे चार दिवस तर डॉक्टरांकडेच खेपा होणार होत्या. लघवी-शौच-रक्त-एक्स रे-शिवाय स्ट्रेस टेस्टही करावी लागणार होती. त्यासाठी माझ्या भावाने– मुकुन्दाने– लगेच त्याचे विद्यार्थी डॉ. भडकमकर यांच्याकडे अपॉईंटमेंट नक्की केली. एक दिवस गोरेगावला, वाशीकरांकडे द्यावा लागला. त्यांनी खूपच माहिती सांगून एक दुर्मिळ पुस्तक– श्री. दाते यांचे 'हिमायलाचे दर्शन' – हेही दिले. (अर्थात् ते वाचायला वेळच झाला नाही.) एक दिवस ठाण्याचेच आयुर्वेदिक डॉक्टरद्वय श्री. जोशी व सौ. स्मिता जोशी यांनाही भेटून आलो. कारण ते यात्रेला जाऊन आले होते. त्यांनीदेखील आवश्यक माहिती व मोलाच्या सूचना केल्या. आमचा उत्साह द्विगुणित केला. लगेच दोघांच्या लोकरीच्या विजारी आम्हाला देऊन टाकल्या. म्हणाले, "काही विकत घेऊ नका. अहो आपल्या हवेत नंतर त्याचा काही उपयोग होत नाही."

**किती किती घेऊ वस्तू?**

एकेक सुहृदांनी, खरोखर, जितकी ज्याला जी शक्य होईल, ती मदत व प्रेरणा दिली की, जायला– निघायला उत्साह दुणावला. जिद्द आणि इच्छाशक्ती अधिक बळकट झाली. आम्ही दोघे सतत तयारीच्या कामात होतो. हे आण-ते

आण, त्यांच्या सूचनांप्रमाणे लागणारी औषधे, इतर खरेदी-एकच गडबड! माझ्या मापाचे ते ट्रेकिंगचे बूट ठाण्यात मिळेनात. लगेच बहिणीला दादरला फोन करून मागवले. सुनन्दानेही तत्परतेने, स्वतःचा वेळ मोडून, ते काम केले. इतरही कितीतरी सामान, माकडटोपी, शाल, विण्डचीटर (मुलाचा) वगैरे त्या बुटांबरोबर, माझ्या भावाची मुलगी गार्गी हिच्याबरोबर तिनं लगोलग पाठवलं. गार्गीनेही गाडीतल्या अमाप गर्दीची पर्वा न करतां, ते प्रेमानं माझ्यापर्यंत पोचवलं. तिनं व तिच्या सासूबाईंनी इतरही खूप मदत मला केली. त्यांनी, म्हणजे सासूबाईंनी, तर मी नुसता अर्ज केल्यावर, 'चित्रलेखा'चा कैलास-मानस वरील अंक माझ्यासाठी विकत घेऊन पाठवला – खास त्यांच्या वैशिष्ठ्याचे लाडूपण करून दिले.

### जो तो सांगे ज्याला त्याला

अहो, सर्व नातेवाईकांना कळवणं, हे देखील एक कामच होतं. तेवढाही वेळ मुद्दाम काढून द्यावा लागत होता. पहिलं पत्र लगेच प्रिय लीलाताईला टाकलं. सर्वात मोठी बहीण माई-तिचा आशीर्वाद म्हणजे आईचा आशीर्वाद. तो तर अत्यंत मोलाचा! तिला फोन केला. धाकटी बहीण लता आणि इतरांनाही फोन केले. पुण्याहून लगेच खाऊ, शाली माझ्याकडे येऊन पडल्या. सुनन्दाच्या मुकुन्दाने त्याच्या अनुभवाच्या, ट्रेकिंगच्या खूप सूचना केल्या. सुनन्दाच्या शाळेतल्या शिक्षिकांनी पाठवलेलं ते सुंदर शुभेच्छा कार्ड प्रेरणा देऊन गेलं. कैलास पर्वताच्या आसपास आम्ही दोघं पोहोचलो आहोत अशी सूचना त्या कार्डात होती. सुन्दीनं तर इतकं काय काय पाठवलं– अहो, आमच्या सामानाला वजनाची मर्यादा होती. त्यामुळे काही सामान ठेवून द्यावं लागणार होतं. पाठवलेल्या सामानातून झिरपत असलेलं सर्वांचं प्रेम-सामान वगळतांना नाकारू तरी कसं? पण प्रेम करणारी माणसं शहाणी-समजूतदार असतातच. त्यांनाही अडचण कळते. पण आम्ही मात्र या सर्वांच्याच प्रेमाने भारावलो-इतके भारावलो-इतके-पण तरीही हा भार समर्थपणे, आनंदाने पेलता येत होता. प्रेमाश्रूंच्या वाहण्यांतून तो सर्वांना समजत होता.

ठाण्यातल्याही सर्व सुहृदांना कळवलं; आणि प्रत्येकाला द्यायला वेगवेगळा वेळ नव्हता म्हणून, सर्वांना नऊ तारखेच्या श्रावणी सोमवारी संध्याकाळी एकाच वेळी बोलावून, शंकराच्या साक्षीनं, निरोप समारंभ केला. अहो निरोप समारंभातसुद्धा काय गोडी आहे ते अशी माणसांची श्रीमंती लाभलेल्यांनाच कळेल.

### अनंत हस्ते जनताजनार्दने

पुष्पाकाकूची खास लोणावळ्याची चिकी, उर्मिलाचे चुरमुरे, मंगलकाकूच्या चकल्या, अपर्णाचे (मानससुनेचे) सुंदर, कुरकुरीत खारे शंकरपाळे, सुनीतीवहिनीच्या आल्याच्या वड्या, अमिता-अच्युतने स्वत: बनवलेली उडीदडाळीची-नलूवहिनीकडून आलेली चटणी, नीलाचा मेसूर, आरतीचा सुका मेवा, नलूमावशीचा चिवडा, पाचक, नीलाच्या आईचे व्हेपर्स, गार्गीची राजागिरा चिकी, सुन्दीचे पौष्टिक लाडू, शुभांगीवहिनीनं माझ्यासाठी खास करून घेतलेले खाखरे, अंजूचे तिखटाचे चुरमुरे, मद्रासी चटणी, खजूर – अहो, यादी तरी किती सांगू? कपड्यांपेक्षा आम्हा खादाडांची 'खादी'चीच बॅग वजनदार होते की काय, असं व्हायला लागलं.

### प्रस्थानापूर्वीचा सत्कार

करताकरता दिवस पळाले आणि बुधवारचा अकरा ऑगस्ट १९९३ चा – गोकुळाष्टमीचा दिवस उजाडला. या सुमुहूर्तावर जणू आम्ही निघत होतो. मंगलाकाकूंनी आदल्या रात्री आमची दोघांची दृष्ट काढली. दिलीप – आरती रात्री मुलांसह आले राहायला. मनासारखं झालं आमच्या. पहाटे उठून आम्ही पूजेसकट आमचे सर्व काम आवरले. ठीक साडेसातला अंजनी-बलराम, सोनूसह हजर झाले. आम्हां दोघांसाठी खूप मोठा भला थोरला हार ते घेऊन आले होते. देवापुढे आम्हांला उभे करून दोघांच्या मिळून गळ्यांत हार घालून आमचा खूपच सन्मान केला. दोघांच्या मिळून, गळ्यांत एकच हार घालण्याची त्यांची कल्पना – अद्वैताची – खूपच भावली मला! आम्हाला भारावल्यासारखे आणि प्रेमाने अवघडल्यासारखे झाले. डोळ्यांतून अर्थातच– सगळ्यांच्याच प्रेमसरी ओघळत राहिल्या. कालदेखील संध्याकाळी येऊन नातवंडांसह आमचे खूप फोटो तिने काढले होते. तिच्या मुलांच्या मित्रांबरोबरचे पण! त्यांचेपण आम्ही आजीआजोबा आहोत ना! आता निघताना पण दोघी सुना-मुलांबरोबर जावई आणि तिच्याबरोबर-नातवंडाबरोबर-आणि बॉम्बे सेंट्रलला जायला एक गाडी पुरणार नाही म्हणून शरददादा नानल आपली गाडी घेऊन आले होते– त्यांचेही गाडीसकट फोटो काढलेन. देवाला वंदन करून निघालो.

सर्व फडके परिवार अंगणाच्या फाटकात निरोप द्यायला आला होता. यात्रेमधल्या कठिणाईने, सर्वांची अंत:करणे थोडी तरी काळजीने हेलावली होती,

एका हाताने डोळ्याला रुमाल, नी दुसऱ्या हाताने 'अच्छा' होत होता. मोठं हृदयंगम दृश्य होतं ते!

बॉम्बे सेंट्रलला आलो. मोठा भाऊ मुकुन्दा खरं म्हणजे येऊ शकणार नव्हता. पण न राहवून, तोही अनपेक्षितपणे निरोप द्यायला आला स्टेशनवर. गाडी अगदी सुटायची वेळ झाली होती. एकदम मिठीच मारली त्याला. बिस्किटाचा मोठा पुडा ह्यांच्या हातात देत, 'सर्व ठीक होईल प्रवास' 'शुभास्ते पंथानः' म्हणाला आणि इतक्यातच गाडी सुटली. तेवढ्या घाईत अंजनीने एक पत्र हातात ठेवलं आणि सर्वांचे दिसेनासे होईपर्यंत हलणारे हात पाहात आम्हीही रुमाल हलवत राहिलो.

गाडी अगदी वेळेवर सुटली. थोडा वेळ काही उमगेचना. भानावर यायला वेळ लागला. आणि मग गाडीतल्या लोकांना उत्सुकता लागल्यामुळे ते विचारत राहिले. बंगाली कंपनी होती – लग्नासाठी दिल्लीला निघालेली. इतक्या कठीण यात्रेला आम्ही या वयात निघाल्याचं समजल्यावर, भलतंच कौतुक वाटलं त्यांना. मग दिल्लीपर्यंत आम्ही मित्रच झालो. शिक्षित आणि सुसंस्कारित माणसं होती. खूप निरनिराळ्या विषयांवर आम्ही बोललो.

गाडी छान निघाली. त्या त्या माणसांमुळे त्या त्या गावांबद्दल कशी जवळीक निर्माण होऊन – लागेबांधे जुळतात नाही? वांद्र्याला सौदामिनीची (पुतणी), कांदिवलीला मंदाकाकूची, अंधेरीला मैत्रीण आणि विहीण 'मनू'ची आणि पारल्याला अजूनही 'आत्याबाई व देसाईंची' – ते नसले तरी आठवण येतेच.

गाडी अगदी सुटता सुटता अंजूने दिलेल्या पत्राची उत्सुकता कमालीची ताणली होती. अधाशासारखं ते पत्र वाचायला घेतलं. बॉम्बे सेंट्रलला येईपर्यंत अंजू हेलावल्यासारखी दिसत होती. मला आणि ह्यांनासुद्धा-इतर कोणत्याही प्रवासाला निघणं, आणि ह्या कठिण प्रवासाला निघणं – जरा निराळंच वातावरण भावत होतं. कालपासून अंजूनं ते वेगवेगळे सर्वांबरोबर फोटो काढणं – हार घालून सत्कार करणं – सारा मायेचा पसारा – पण कुठल्या तरी कोपऱ्यांत हुरहूर दाटली होती – आणि एकदम लक्षांत आलं – बुधवार आहे आज – 'जाशील बुधी तर – आपण परत येणार आहोत ना? आतून आवाज आला – नक्कीच – आजच्या बुधवारी 'गोकुळाष्टमी'चा दिवस आहे. त्या जगन्नियंत्याच्या जन्मदिवसाचा सुमुहूर्त आहे. अंजूचं पत्र वाचताना, पुन्हापुन्हा डोळ्यांत जमणाऱ्या अथांग सागरामुळं, सारखा अडथळा होत होता.

## असेही एक "प्रेम"-पत्र – भावबंधाचे प्रबंध

प्रेमभरानं भरलेलं ते पत्र– मी पुन्हापुन्हा हृदयाशी धरत होते. अंजनी पत्र फार छान लिहिते– तिनं लिहिलं होतं– लिहिलं होतं कशाला, तिचं सर्व पत्रच उद्धृत करायला हवं–

*॥ श्री ॥*

*१० ऑगस्ट ९३*

*ॐ नम: शिवाय!*

*प्रिय ती. पू. आई-दादांना सप्रेम शि० सा० नमस्कार.*

*सुदैवाने कैलास मानस सरोवर ह्या यात्रेसाठी तुमची दोघांची निवड झाली, तशी तार तुम्हाला मिळाल्यादिवशीच लगेचच दिल्लीची तिकीटे आरक्षित करून तुम्ही माझ्याकडे ती खुशखबर सांगायला आलात. त्या संबंधी आपण खूप बोललो. तुम्ही दोघं चहा घेऊन निघूनही गेलात आणि माझ्या मनात संमिश्र भावनांनी एकच गर्दी केली. कारण ह्या वेळची ही यात्रा इतर प्रवासासारखी नाहीये. यात्रेचे ठिकाण अतिशय दूरवर- आणि मुख्य म्हणजे एकदम वेगळ्या वातावरणाचे, त्या दृष्टीने सर्व तयारी-आखणी करणं आवश्यक होतं. शिवाय तार मिळाल्यादिवसापासून इथून निघायला तुम्हाला फक्त १०च दिवस बाकी असल्यामुळे सर्व तयारी अगदी घाईगडबडीने करायला हवी होती. त्याच्या जोडीला परत एकदा सर्व मेडिकल टेस्ट्स्-म्हणजे तो वेळ मोडणंही आवश्यकच होतं.*

*झालं– तुम्हा दोघांची पंचविशी-तिशीतल्या युवक-युवतीप्रमाणे उत्साहाने-लगबगीने-विचारपूर्वक-योजनापूर्वक तयारीला सुरुवात झाली. किंबहुना ह्या यात्रेसाठी फॉर्मस् भरून पाठवल्याबरोबरच निवड होईल वा नाही-पण झाल्यास त्यासाठी गरजेचे आणि अतिआवश्यक असे प्राणायामाचे व्यायाम अगदी तज्ञाकडून शिकून घेण्याची चिकाटी– ते नेमाने करण्याची साधना ह्या प्राथमिक गोष्टी अगदी प्रयत्नपूर्वक सुरू झाल्या. तुम्हा दोघांची निरोगी-सुदृढ प्रकृती ही देवाचीच देन आणि प्रत्येक चांगल्या तसेच नि:स्वार्थी कामासाठी कायम असणारा ईश्वराचा शुभ-मंगल आशीर्वाद– सुदैवाचं पाठबळ– जबरदस्त आत्मविश्वास – ह्या सर्व गोष्टींच्या मिलापाने तुमच्या तयारीचा श्रीगणेशा तर उत्साहाने, आनंदाने झाला. निवड झाल्याची तार आल्याबरोबर आता प्रत्यक्ष प्रवासासाठी लागणाऱ्या सामानाची जमवाजमव करणं-खरेदी करणं– तसंच सर्व सुहृदांना-नातलगांना ही खुषखबर कळवणं हेही तातडीनं करायला सुरुवात झाली कारण निघायचा दिवस १०च दिवसानंतर होता. आई-दादा, गेले ७-८ दिवस मी पाहतेय, तुमच्यातील उत्साहाने-गतिशीलतेने-तत्परतेने अगदी उच्चांक गाठलाय. तुम्हा दोघांची कामाची*

*लगबग-अचूक तयारी- विचारपूर्वक योजना- अर्थात ह्या सर्वांच्या जोडीला आपल्या सर्व आप्तस्वकीयांचंही मन:पूर्वक – सदिच्छांसह असलेलं सहकार्य – हेही तितकंच महत्त्वाचं – उपयोगी पडणारं – हेवा करायला लावणारं असंच आहे नाही का? आशावहिनी म्हणते तसं खरंच पैशापेक्षा – सोन्यानाण्यापेक्षा हे माणसांचं – आप्तांचं – सुहृदांचं असलेलं आपलं वैभव खरंच मिरवण्यासारखं अभिमानास्पद आहे. नाही का? आपापल्यापरीनं – सुचेल तसं – प्रत्येकानं काही ना काही, फूल ना फुलाची पाकळी अशा स्वरूपात मदत केलीय. शिवाय प्रत्यक्षात भेटून दिलेल्या सदिच्छा ह्या नंतर. तू म्हणतेस तसं, खरंच इतकं बळ येत नाही कठीण कामाला सुद्धा!*

*तुम्हा दोघांना स्वत:साठी लागणाऱ्या वस्तूंची तयारी ही तर करणं गरजेचंच पण त्याचबरोबर मला विशेष जाणवलेला, आई-तुझ्या स्वभावातला प्रेमापोटीचा दूरदर्शीपणा- म्हणजे समीर-कविताचे परिक्षेतल्या यशाबद्दलचे बक्षीस- जावयांचे अधिक महिन्याचे वाण (त्यासाठी आरतीला दिलेल्या सूचना) सोनुचा वाढदिवस-समीरच्या ॲडमिशनसाठी जरूर पडल्यास लागणाऱ्या रकमेची व्यवस्था – गणपतीला तुम्ही नसल्यामुळे पुष्पाकाकूला दिलेला-उपयोगी पडणारा सल्ला ह्या सर्व बाबीही लक्षात ठेवून तितक्याच आत्मीयतेने करण्यातली तत्परता आणि दादा तुमची बाहेरची सर्व कामं करण्यातली लगबग- होणारे हेलपाटे ह्याला तर तोडच नाही. आमच्यासारख्यांनाही इतकं सर्व करणं जमेल का अशी साशंकताच मला वाटते – तुमचं कौतुक करण्याएवढी मी मोठी नाही. पण तुमच्यासारखे आईवडील मिळाल्याबद्दल मला मी अत्यंत सुदैवी समजते, अतिशय अभिमान वाटतो मला – आता, प्रथमच, ह्या यात्रेचा अवधी बराच असल्यामुळे प्रत्यक्ष आपली भेट ४०-४५ दिवसांनी – खूप कंटाळा येणार आहे आम्हाला... पण इलाज नाही – मस्त मजा करा – फोटो वगैरे काढा. आणि जपा दोघं स्वत:ला आणि एकमेकांना – आल्यावर तुमच्या दोघांच्या वर्णनातून ऐकून आम्हीही मनानं फेरफटका मारून येऊ मग 'कैलासमानस'ला! असो.*

*"प्रवासासाठी आणि यात्रा सुखरूप पार पडण्यासाठी आम्हा दोघांतर्फे तुम्हा दोघांना प्रेमळ–सदिच्छा!"*

*तुमचीच,*
*सौ० अंजनी*

*नोट – शक्य होईल तिथून पत्र पाठवा. म्हणजे आम्हाला तेवढाच दिलासा मिळेल आणि भेटल्याचं समाधान! (पत्र रूपाने कां होईना?)*

## दिल्लीतील (आमचेही) धागेदोरे

दुसऱ्या दिवशी, ऑगस्ट बाराच्या गुरुवारी दिल्लीत आलो– दुपारी तीन वाजता. एवढ्याशा ओळखीच्या धाग्यावर लोकप्रिय खासदार रामभाऊ कापसे, ह्यांच्याकडे उतरलो होतो. समाजकार्यातला खारीचासुद्धा नाही-मुंगीचा वाटा-मला इथे उपयोगी पडला होता. रामभाऊंनी अजिबात अवघड वाटू दिले नाही. लगेच चहापाणी केले आमचे. त्यांना कामासाठी लगेच निघायचे होते. संध्याकाळी सून-मुलगा आले. त्यांनीही प्रेमानं विचारपूस केली. दंडवते व विवेक दाढकर म्हणून त्यांचे कार्य-सहकारी तेव्हा तिथे होते. हा तरुण मुलगा-विवेक दाढकर-ह्याची आम्हाला खूप मदत झाली-दिल्लीत. देव मला माणसं कधी कमी पडू देत नाही. हा अनुभव कितींदा आला आहे. त्या त्या माणसांच्या रूपानं तोच नाही का अवतरत ?

'साउथ ब्लॉक' म्हणून दिल्लीत भाग आहे तिथे आमची उद्या वैद्यकीय तपासणी होणार होती. रामभाऊंच्या घरापासून ते ठिकाण जवळ होतं. त्यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे, संध्याकाळी जाऊन ते ठिकाण बघून आलो.

स्वच्छ, सुंदर आखीव रस्ते, अत्यंत सुंदर बांधकामाची लाल दगडांची, एखाद दोन मजलीच इमारत, सर्व भव्य दिव्य-इमारतीचे दोन्ही बाजूचे जिने-सुद्धा रस्त्यांएवढे रुंद-सुंदर एकपदरी वाहतूक, बरीचशी सर्कल्स्-तीही हिरवीगार-कारंज्यांची ! मन प्रसन्न झालं. पण तरीही मनात आलं, या साऱ्या इतमामाला-वैभवाला शोभेल असा राज्य कारभार मात्र नाही. त्यामुळे या सुंदरतेवर एक प्रकारची अवकळा जाणवली. असो.

## कापसे कुटुंबाची कळकळ

रात्रीची जेवणं उशीरानं, कापसे कुटुंबाबरोबर झाली-गप्पा मारत. त्या मनमोकळ्या गप्पांमुळे जेवणातल्या सफरचंदाच्या सॅलडची चव अधिकच वाढली. त्यांची विनयशील, आता मराठीच झालेली, आंध्रमधली सून, एकदम माझीच होऊन गेली. दोघेही नवराबायको पीएच्.डी करताहेत. ऑफीसचं काम सांभाळून. मी आमचा उद्याचा कार्यक्रम त्यांना सांगितला व सोयीच्या दृष्टीने,

आम्ही बाहेर जेवू म्हणून सांगितले. रामभाऊंनी 'महाराष्ट्र-सदन' म्हणून त्यांच्या जवळच असलेले-त्याचे मार्गदर्शन करून-माहिती करून दिली. जवळच एक मोठे बंगाली मार्केट असलेले 'विवेक'ने सांगितले. ह्या गोष्टी जवळ असल्याने फार सोयीचे झाले.

## वैद्यकीय चालढकल

तेरा ऑगस्टला आमची मेडिकल होती. दुसऱ्या दिवशी ठीक साडे सातलाच तिथे हजर झालो. आणखीही दोघे-चौघे आले होते. पण शेवटी परराष्ट्र मंत्रालयाचे, 'संदीपकुमार' आले आणि आज वैद्यकीय तपासणी होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. तारखांचा घोटाळा काहीतरी झाला म्हणे! पुन्हापुन्हा 'सॉरी' म्हणून त्यांनी आम्हाला निरोप दिला. पण वाट पाहणं-मग त्यांनी येणं, हे सर्व होईपर्यंत साडेनऊ वाजले होते. आमचा वेळ मात्र उगीच गेला. निवड झाल्याची तारही खूप उशीरा-इथेही आज तारखांचा गोंधळ-काय म्हणावं या शासनाला ?

## माथुर

दिल्लीमधलेच एक पंजाबी जोडपेही-श्री. व सौ. माथुर – आले होते. बाई भलतीच जाडजूड-डोक्याला टक्कल अशी. ही दोघंही ह्या यात्रेला निघालीयत्, पाहिल्यावर माझ्या मनाला उभारी आली. नाही म्हटलं तरी मधूनच मनावर ताण असायचा की आपणच फक्त वयस्क की काय ? होईल ना आपल्याच्यानं ? वगैरे. त्या दोघांशी जुजबी ओळख झाली. सौ. माथुर तेवढ्या ओळखीतच मला आवडून गेल्या. मीही त्यांना आवडल्याचं जाणवलं. आणि मग पुढे सबंध यात्रेत आम्ही जवळच्या मैत्रिणीच झालो. त्यांनी आम्हा दोघांना, आपल्या गाडीतून आमच्या घरी सोडलं म्हणजे कापसेंकडे. आता ते आमचंच घर झालं होतं ना!

संध्याकाळी बूट घालून चालण्याची तालीम अंगणातल्या अंगणांत अर्धा-पाऊण तास केली. ठाण्याला पायमोजे घालणे आणि बूट घालणे ह्याची शिकवणी ह्यांनी दिली होती. अजून पटापट ते काम जमत नव्हतं. काल संध्याकाळीपण बुटाची तालीम केलीच होती. आता दिल्लीत सहासात दिवस आहेत, तोपर्यंत रोजच ती करायची आहे. बाहेर जाताना बूटच घालून जायचं ठरवलंय्. आजपर्यंत कधीही बूट पायाला नसल्यामुळे फार कठिण वाटतंय् हे प्रकरण. त्याचं वजनच नकोसं होतं.

रात्री हिमगौरीला (माझ्या भाचीला) फोन केला. ग्रिण्डलेज बँकेत ती ऑफीसर आहे. तिने माझ्यासाठी गुळाच्या पोळ्या कुणाकडून तरी करवून

घेण्याचं मान्य केलंय्. यात्रेमधे न्यायला! ती व तिच्या सासूबाई म्हणे काल कापसेंकडे भेटायला येऊन गेल्या; आम्ही नेमके नव्हतो. त्यांनी जेवायला बोलावलय्. त्याही आर्टस्कूलच्या टीचर आहेत. मेडिकलसाठी 'ऑल दि बेस्ट' सांगून गेल्या.

## वैद्यकीय तपासणी आणि व्हिसा – एक सोहळा!

दुसऱ्या दिवशी, शनिवारी मात्र, चवदा ऑगस्टला अखेर वैद्यकीय तपासणीचा दिवस आला. मोठा थोरला भव्य हॉल, अवाढव्य लंबवर्तुळाकार टेबल, प्रत्येकापुढे माईक– आपण कुणीतरी खास आहोत असं वाटावं-त्या ऐटीमधे! जणू काय राष्ट्रीय स्तरावरच्या बैठकीलाच बसलोत आम्ही-असा थाट वाटत होता. छान वाटत होतं. 'संदीपकुमारां'नी, प्राथमिक माहिती सुरुवातीला दिली. मग प्रत्येकानं आपापली ओळख करून दिली. बत्तीस जणांच्या गटात, आम्ही तिघेचौघेच वयस्क आहोत. त्यात आमचे वय अधिक. शिवाय महाराष्ट्रीयन आम्ही चौघेच. आम्ही दोघे; पुण्याचे 'वारीं'तले मोने आणि पेणच्या उत्तरा देव. सगळ्यांचे पासपोर्ट जमा केले आणि व्हिसाकरता प्रत्येकी रु. १४० घेतले. व्हिसाचं काम शासनातर्फे होतं. चीनचा व्हिसा काढायचा असतो.

नंतर सगळ्यांना चहापाणी दिलं आणि मग बसमधून दहा वाजता, सगळ्यांची रवानगी, 'इंडियन तिबेट बॉर्डर पोलीस' (आय्.टी.बी.पी.) ह्या हॉस्पिटलमधे झाली. लष्कराचं हे हॉस्पिटल आहे. पाऊण तास लागला तिथे पोचायला. डॉ. राव म्हणून तिथले प्रमुख डॉक्टर होते. त्यांनी वैद्यकीय तपासणीबद्दल सर्व काही समजावून सांगितले. अत्यंत आदरणीय वाटावा असा माणूस! व्यक्तिमत्व चांगलं. गोड बोलणारा. दिसण्यात 'स्मार्ट' आणि हुशारीची चमक चेहेऱ्यावर. तसाच परराष्ट्र मंत्रालयाचा तो 'संदीपकुमार'. नेमकं बोलणारा-आणि छान सगळं समजावून सांगणारा! यात्रेबद्दलची सर्व कल्पना सुसंगतपणे त्यांनी दिली.

वैद्यकीय तपासणी-इतक्या जणांची व्हायला अर्थातच वेळ लागला. दुपारी एक वाजता सर्व काम संपलं. अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे दोघंही त्या तपासणीत उत्तम ठरलो. आमची निवड पक्की झाली.

संध्याकाळी पुन्हा बूट घालून चालण्याची प्रॅक्टीस! बाकी कशाला मी भीत नव्हते. पण हे बूट म्हणजे मी रडकुंडीला यायची. बूट घालूनच बंगाली मार्केटमधे फिरायला गेलो. येथील वस्तू व पदार्थांचा दर्जा छान आहे.

**आपकी पेहचान ? इन्सान !**

तिथून येताना ह्यांना घरी फोन लावायचा होता. दिल्लीतल्या वैद्यकीय तपासणीतही आम्ही 'ठीक' ठरून आमची निवड झाल्याचं मुलांना कळवायचं होतं. म्हणून वाटेतल्या एकाला एस्. टी. डी. कुठून करता येईल म्हणून विचारलं – तर त्याने अमुक ठिकाणी म्हणून सांगितलं. 'कितना दूर है ? रिक्षासे जाना पडेगा क्या ?' तो बोला 'हाँ !' इतक्यात गाडीत बसलेली त्याची बायको म्हणाली – आपणच सोडू ना त्यांना. तोही लगेच, 'चलो, हम छोडते हैं' म्हणाला, नि अवघडत कां होईना – आम्ही गाडीतून निघालो. त्यांची दोन छोटी मुलंपण होती. कुठले कोण –ना ओळख ना पाळख – पण एकदम हे घडलं खरं ! किती साह्यकारी माणसं ! आम्हाला सोडताना, मग 'थँक्स' म्हणण्यापूर्वी – मी म्हटलं, 'आपकी पहेचान ?' तरुणी म्हणाली, "मैं मुस्लीम हूँ."

'इसमें क्या है ?' मी.

तो अहमद आझम आणि ती निखस. मी म्हटलं, "आपल्याला मी कधीही विसरणार नाही. आपल्याबद्दलची भावना कोणत्या शब्दात व्यक्त करू ?" त्यांनाही बरं वाटलं. त्यांनी मग निरोप घेतला. आमच्या शाळेजवळचे 'काझी' वकील, आमचा कॉन्ट्रॅक्टर हमीदभाई व त्याचा पुत्र 'आयुब', त्यांचाही चांगला अनुभव होताच की !

मग तिथून घरी येताना मात्र रस्ता चुकलो. काही केल्या रिक्षा मिळेना. रात्रीची वेळ. मला थोडी भीती वाटायला लागली. रस्त्यावर कुणाला विचारावं, तर सगळे वाहनवालेच. झर्रकन् जायचे. अखेर एका-दोघांना 'प्लीज, प्लीज' करत थांबवून – खरं म्हणजे चक्क अडवूनच – रस्ता विचारला. ते सांगत होते, तेवढ्यात रिक्षा मिळाली – अक्षरशः घुसलोच त्या रिक्षात, पण नेमकी त्या रिक्षेवाल्यालाही कॅनिंग लेन माहीत नव्हती. खूप इकडे तिकडे हिंडवत एकदाचे जागी आलो. आता मात्र 'विवेक'ला घराच्या आणखी खुणा विचारून घ्यायच्या ठरवल्या.

**परतीची आरक्षणं**

दुसऱ्या दिवशी म्हणजे – पंधरा ऑगस्टला रविवारी, परतीचं रिझर्व्हेशन करायला निघालो. कारण निवड झाल्यामुळे परत जाण्याची, वीस सप्टेंबर ही तारीख नक्की झाली होती. म्हणा निवड नसती झाली, तरी आम्ही काही लगेच परतणार नव्हतो. मग, 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'ला जाऊन यायचं आमचं ठरलं होतं. हिमालयात फिरायला कुणालाही आवडतंच.

सप्टेंबरच्या वीस तारखेचं, संध्याकाळच्या, पाच वाजताच्या पश्चिम एक्सप्रेसचं रिझर्व्हेशन केलं – तसं लगेच ठाण्याला कळवलं.

**वय चोरायचं की वाढवायचं?**

आरक्षणाच्या वेळीही एक छान अनुभव आला. फॉर्म भरून तिथल्या माणसाजवळ दिल्यावर, खरं म्हणजे त्यांनी त्याप्रमाणे तिकिटं द्यायची, पण तो म्हणाला, "अहो, बाईचं वय चौसष्टच्या ऐवजी पासष्ट लिहा म्हणजे त्यांना तिकिटात सवलत मिळेल आणि खालचा बर्थ मिळेल." मनात आलं, ह्या अनोळखी, परप्रांतातल्या माणसाचं, तसं बघितलं तर काय अडलं होतं – आमची सोय बघण्याचं? पण नक्कीच गेल्याजन्मीचे काहीतरी लागेबांधे आहेत. कालसुद्धा नाही का गाडीतून सोडणारा भेटला? अशा माणसांच्या रूपांनीच तर देव भेटत असतो. देवा, खरंच तुझ्या प्रेमाची मी ऋणी आहे. माथ्यावर मिरवण्यासारखं हे ऋण आहे.

आता उरलेल्या दिल्लीतल्या खरेद्या, सकाळी व संध्याकाळी बूट घालून चालण्याची प्रॅक्टीस वगैरे चार दिवसात चालू होतं. निवड झाली म्हणून कापसे यांच्याकडेही मिठाई दिली. ठाण्याला एक दोन पत्रं टाकली. आणि....

# यात्रा सुरू

## आगे कूच !

अखेरीस ती गुरुवारची एकोणीस तारीख उजाडली. आदल्या रात्री झोपायला साडेबारा झाले होते. कारण सर्व बॅग-बॅगेज बांधाबांध करायची होती. हिमगौरीकडून गुळाच्या पोळ्यांचं पार्सल मुळी साडेनऊला आलं. त्याच्यापुढे पंखा लावून त्या गार करणं, मग पॅकिंग करणं – टेलिफोनला गजर करायला सांगणं – कारण रात्रीच पावणेदोनला उठायचे होते. ह्यांना वाटलं, नेमका घड्याळाचा गजर झाला नाही किंवा होऊनही झोपेत कळला नाही तर? टेलिफोनची ही सोय छानच आहे. वेळी-अवेळी उठायला नको म्हणून रामभाऊ कापसे, दंडवते वगैरेंचा निरोप रात्रीच घेतला. त्यांना नमस्कार करून आशीर्वाद व शुभेच्छा घेतल्या. त्यांनाही कठीण यात्रेमुळे कौतुकाबरोबर थोडी काळजीही वाटत होती.

## विवेक दाढकर

रात्री पावणेदोनला उठून, आंघोळीसकट सर्व आवरून पावणेतीनला फोन करून टॅक्सी बोलावली. टॅक्सी-स्टॅंडवर काल संध्याकाळीच तसे सांगूनही ठेवले होतेच. विवेक दाढकरने ह्या बाबतीत खूप साह्य केले. तो एवढ्या रात्री आमच्यासाठी उठला होता. एवढे थोरले डाग – टॅक्सीत चढवायला मदत केलीन, अतिशय 'हेल्पफुल' आणि प्रेमळ मनुष्य. आम्हाला किती आधार वाटत होता त्याचा. त्याचा निराप घेऊन – यात्रेचे प्रस्थान ठेवले, त्यावेळी अर्थातच घरच्या सर्वांची आठवण होऊन मन हुरहूरलं. मनानेच ठाणेकरांचाही निरोप घेतला, देवाची प्रार्थना केली आणि उत्साहाने निघालो. रात्रीच्या ठीक तीन-दहाला, 'चंद्रलोक'च्या इमारतीत पोचलो. 'कुमाऊँ विकास निगम मंडळ'चं ऑफीस तिथे आहे. कैलासनाथाच्या माथ्यावर चंद्र आणि ह्या इमारतीचं नावपण 'चंद्रलोक'. योगायोगाची मजा वाटली. 'विकास निगम'च्या बसेस आमच्यासाठी तयार होत्याच. एकेक यात्री पाठोपाठ येतच होते. दिल्लीतल्या 'कैलासनाथ आश्रम'चे 'राधाकृष्ण' स्वामी आम्हाला मुद्दाम निरोप द्यायला आले होते. शुभाशीर्वाद देताना त्यांनी आम्हा सर्वांना चहा दिला व प्रसादाची म्हणून

एकेक नास्त्यासारखीच पुडी दिली. चहानं फार बरं वाटलं, कारण नाहीतरी इतक्या रात्री घरी चहा घेतलाच नव्हता. संतांचा आशीर्वादही अशा यात्रेला खूप समाधान व धीर देऊन गेला. त्यांच्या पायां पडून, एकेकजण बसमधे स्थानापन्न झालो. त्याआधी बसवर सर्वांचं सामान चढवलं गेलं होतंच. दोन बसेस होत्या.

'दुर्ग'हून एक 'अगरवाल' कुटुंब या यात्रेला आलं होतं. आईवडील नि तरुण लग्नाचा मुलगा. अत्यंत सुस्वभावी, उदार नि भाविक असं पुढे अनुभवाला आलं. यात्रेच्या सुरुवातीला, 'चंद्रलोक'वर त्यांनी सर्वांना एकेक गुलाबाचं फूल देऊन स्वागत केलं. त्यांची ही कल्पना मला एकदम आवडली. सर्वांशी सुरुवातीलाच संपर्क साधताना त्यांनी दाखवलेली रसिकता मला फार भावली. मी ते फूल तीन दिवस (सुकेपर्यंत) जपून ठेवलं होतं. त्यांनाही ह्या माझ्या भावनेनं फार बरं वाटलं. अत्यंत प्रसन्न मनाने, कैलासनाथाच्या जयजयकारात, ब्राह्ममुहूर्तावर, आमच्या बसने दिल्लीहून कूच केले.

**कौसानी – कई मकाम आएंगे!**

पूर्ण तेरा-चौदा तासाच्या प्रवासानंतर संध्याकाळी साडेसहाला आम्ही 'कौसानी'ला आलो. वाटेत नास्ता आणि दुपारी अडीचला जेवण घेतलं होतं. 'खैरना' हे जेवणाचं ठिकाण छान होतं. एका बाजूला नदी वाहात होती; दुसऱ्या बाजूला डोंगर. बुफे पद्धतच होती. सर्वत्र तीच असणार आहे. या प्रवासात कुठेही दही-ताक मिळणार नाहीये. 'कौसानी' मस्त थंड हवेचं, दाट झाडीच्या वृक्षांचं, पर्वताचं ठिकाण आहे. आमचं विकास निगमचं हॉटेलपण छान होतं. दोन मोठे ऐसपैस दिवाणखाने, स्त्रिया व पुरुषांसाठी वेगवेगळे. चहा नास्ता अंगणात. जेवण हॉलमधे. बऱ्याच टेकडीवजा पायऱ्या उतरून जाऊन मग हॉल होता जेवणाचा. वातावरण मस्त थंड होतं. थंडीत कुडकुडत, शाली लपेटतच सर्व जेवायला खाली आलो. नास्ता बटाटे-पराठ्याचा, वेगळ्या प्रकारचे सुंदर फरसाण, बिस्किटे पण वेगळी. जेवण पण छान, लोणची पण छान होती. गाजर, लिंबू, मिरची, कैरी वगैरेची. रात्री सर्वांनी शेकोटी पेटवून त्याभोवती जमून गाणी वगैरे म्हणून मजा केली. एव्हाना सर्वांशी ओळखी झाल्या होत्या – होत होत्या. आमच्याबरोबर 'जलज श्रीवास्तव' म्हणून गव्हर्नमेंटचे लियाजन ऑफीसर होते. तेही यात भाग घेत होते. मी 'शिव सोहं'चा जप चालीत सांगितला. गाडीत श्रीरामाचा जप झालाच होता. ती चाल सर्वांनाच खूप आवडते. मी आणि ह्यांनी, 'पंकज मलिक'चं जोडीनं म्हटलेलं, 'ये रातें, ये

मौसम, यह हंसना-हंसाऽऽना' हे गाणं सर्वांना खूपच आवडलं. भजनापासून ते 'तुझी चाल तुरुतुरू' पर्यंत मराठी गाणीसुद्धा गायली गेली. थंडीने आणि तेरा चौदा तासांच्या बसमधल्या प्रवासाने, त्या मस्त थंडीत झोप छानच लागली.

**धारचुला**

दुसऱ्या दिवशी पहाटे ५॥ लाच नास्ता करून 'धारचुला'ला निघालो. आता रोज नास्ते असे पहाटेच घ्यायचे आहेत. वाटेत, फार प्राचीन, पांडवांच्या काळचे एक स्वयंभू 'वैजनाथा'चे नदीकाठचे मन्दिर व बागेश्वरचेही मन्दिर पाहिले. या ठिकाणी प्रजेचे राक्षसांपासून रक्षण करण्यासाठी शंकर काही काळ व्याघ्ररूपांत राहिला होता – म्हणून व्याघ्रेश्वर– त्याचे पुढे बागेश्वर झाले. डोंगराना वळसे घालणाऱ्या रस्त्यांवरून येता येता, 'चौकोडी' नावाच्या गावाला जेवायला थांबलो. इथेही जेवण अतिशय छान. 'पायसम्' होते जेवणात. भात रोज बासमती – दिल्ली राईसच खात आहोत दिल्लीत आल्यापासून! 'चौकोडी'ला चहाचे मळे आहेत. जेवणानंतर सगळ्यांचे पासपोर्ट इथे जमा केले. यात्रिकांची नोंद पुन्हा झाली आणि मग, ग्वालदम, थल, पिथोरागड वगैरे गावं मागे टाकत, संध्याकाळी पाच वाजता, 'धारचुला' या रम्य ठिकाणी पोचलो. 'कौसानी'ला एकदम उंचीवर तर इथे डोंगराच्या पायथ्याशी!

**भारतमातेच्या अंकावर**

चारी बाजूला अगदी जवळून वेढणारे, हिरवेगार डोंगर – नव्हे पर्वत – खळखळ वाहाणारी मधली नदी – जणू भारतमातेच्या मांडीवर आम्ही पहुडलो होतो. त्या उंचनींच निसर्गाचं रूप पाहून आपण म्हणजे किती छोटे – अगदी एक मुंगीच असं वाटत राहिलं. या उंचीकडे पाहतापाहता, मनाचीही उंची इतकी वाढवली पाहिजे माणसानं – 'मन आभाळ आभाळ' केलं पाहिजे – हे ह्या निसर्गापासून शिकायचं. गप्प बसून हे रूप न्याहाळावंसं वाटतं. कमाल वाटते या भव्य उदात्त – निसर्गाची आणि त्याबरोबरच मानवाची पण, कारण या कठिणतम निसर्गापर्यंत पोचण्यासाठी, आपल्या बुद्धीचं कौशल्य पणाला लावून किती रस्ते, किती सोयी केल्यायत् त्यानं आणि अजूनही करतोय्.

रात्री पुन्हा एकदा, 'ब्रीफिंग' झालं – 'कुमाऊँ विकास निगम'कडून पासपोर्ट आम्हाला परत दिले. सामान सगळं रात्रीच बांधायला सांगितलं. उद्यापासनं मुख्य प्रवासाला – चढावाच्या पायी प्रवासाला सुरुवात होणार होती – त्याची माहिती दिली. संभाव्य धोकेही सांगितले. ते सांगत असताना, इतका कडाडून

पाऊस पडत होता की, प्रत्येकाच्या मनात उद्याच्या सुरू होणाऱ्या कठीण प्रवासाची जरा धाकधुकच होती.

### निसर्गाची बदलती फॅशन

चिखलातून – घसरड्या वाटेवरून चालावं लागणार – पण त्या 'कुमाऊँ'ने धीर दिला. म्हणाला, इथला निसर्ग तुमच्या मुंबईच्या फॅशनसारखा आहे. फॅशन कशी सारखी बदलते – आजची उद्यालाही – तसा इथला निसर्गही बदलत असतो. सकाळचा संध्याकाळला; रात्रीचा सकाळला नसेल. घाबरू नका. उद्यापासून ऊन पडेल. त्यानं धीर दिला. सूचनेप्रमाणे सगळ्यांनी क्लोरीनच्या गोळ्या पिण्याच्या पाण्यात टाकून घेतल्या. जरा धाकधुक मनानेच सर्व तयारी झाली, पण पुढे मग अनुभव आला – कोणी विशेष त्या गोळ्या वापरत नव्हते. कैलासवरून येणारं, प्रदूषण विरहित – सुंदर थंडगार पाणीच आम्ही प्राशन करत राहिलो.

पहाटे ४॥ ला उठून तयारी केली. श्वसनशुद्धीचे व्यायाम व देवाचा जप स्तोत्र – हे रोजचं आन्हिक चालू आहेच. श्रीकृष्ण म्हसकरने शिकवलेले हे व्यायाम खरंच खूपच आरोग्यदायक आहेत. ते मुद्दाम आम्ही, या विरळ हवेत तरण्यासाठी शिकून घेतले.

### घाटातल्या वाटा

आजपासूनच्या प्रवासासाठी सलवार-खमीज, शर्ट-पॅन्ट व मुख्य म्हणजे मला अवघड वाटणारे बूट घालायचे होते. 'तवाघाट' पर्यंत अर्ध्या-पाऊण तासांत बसने आलो. मग पर्वत चढायला सुरुवात केली. त्यापूर्वी इथे घोडे – हमाल – काठ्या घ्यायच्या असतात. घोड्यासाठी रोजचे एकशेपासष्ट रुपये द्यायचे असतात. शिवाय वाटेत चहापाणी. हमाल किंवा घोडे इथेच घ्यावे लागतात. वाटेत मधेच कुठेही मिळत नाहीत. आम्ही जाववेल तितकं पायी जायचं ठरवलं होतं – पण घोडे घेऊन ठेवले होते. आठ वाजता सर्वांनी चढायला सुरुवात केली. ओम् नम: शिवाय म्हणून – लवून नमस्कार करून! सारखे साडेतीन तास चढत होतो. भलताच चढ होता. धाकधुक सुरुवातीला होती चढ बघून – पण शिवाच्या कृपेनं दमायला झालं नाही. आम्ही काठ्या टेकत सावकाश सावकाश चालत राहिलो.

साडेअकरा वाजता 'ठाणेदार' हे चहाचं पहाडातलं ठिकाण आलं. 'हुश्श' केलं. थोडी विश्रांती घेतली – चहा खाणं झालं आणि निघालो. इथे खाणं

म्हणजे पुऱ्या – ब्रेड वगैरे नसतो. अलू-सब्जी, किंवा मटरसब्जी अशा तऱ्हेचंच खायचं; पण तेही गरमगरम, थंडीतलं खाणं दमल्या जिवाला इतकं गोड लागतं की विचारू नका. चांगलं द्रोणद्रोण फस्त करतो आपण.

आता चढ संपला होता. सरळ आणि रुंद रस्ता होता, पण ऊन खूप होतं. अवघं दोन कि.मीटर अंतर उरलं होतं. मग 'पांगू' हे ठिकाण आलं. पिण्याचं पाणी इथे मस्त थंडगार होतं. दुपारी १ ला जेवण झालं. थोड्या वेळानं घोड्यावरून सामान आलं.

इथे स्त्रीपुरुषांसाठी एकच मोठा हॉल होता. जेवणं वगैरे झाल्यावर सर्वजण विश्रांती घेत होते. मला कसंसंच व्हायला लागलं होतं. चढ यशस्वीपणे चढले म्हणून खुषीत होते – तर हे काय आता? पण एक 'फाडिया' म्हणून डॉक्टरीणबाई होत्या आमच्याबरोबर. त्यांनी गोळी दिली नी जादू केल्याप्रमाणे अर्ध्या तासात बरं वाटलं.

**'सिर्खा'चा नारायण आश्रम**

दुसऱ्या दिवशी दहा किलोमीटरवर असलेल्या 'सिर्खा'ला जायचं होतं. आजचा रस्ता फारसा अवघड नव्हता. वाटेत 'नारायण आश्रम' आहे, तेथे एक तास थांबलो होतो. नारायणस्वामी म्हणून होते, त्यांनी कैलास-मानस यात्रा करून आल्यावर 'पिथोरागड' या ठिकाणी आश्रम स्थापून या गावाची खूप सुधारणा केली. शेती करायला शिकवून ती वाढवली – प्राथमिक शाळा काढली. हे नारायण स्वामी खूप शिकलेले होते. त्यांच्या आश्रमात नंतर 'चिन्मयानंद' येऊन राहिले होते. त्यानंतर त्यांनी नारायणस्वामींच्या प्रेरणेने वेदशिक्षणासाठी सगळीकडे आश्रम काढले. पवईचा आश्रम त्यांचाच. आम्ही या यात्रेला निघताना नुकतेच त्यांचं चिन्मयानंदांच निधन झाल्याचं वाचलं होतं. सध्या येथे 'गायत्रीदेवी' म्हणून प्रमुख आहेत. ह्या कोणत्या तरी कॉलेजात प्राचार्य होत्या. आता ह्या आश्रमाला त्यांनी वाहून घेतलं आहे.

# विलोभनीय विस्मयकारक वैभव

## पहाडियाकडे पाहुणचार

वाटेत एका पहाडियाचे घर त्याच्याकडे जाऊन बघितलं. छोट्या छोट्या उंचीची, लाकडाची दोन तीन मजली घरं. तळघर पण होतं. त्यात मेंढ्या किंवा गुरं किंवा घोडे जे ज्याच्याकडे असेल ते ठेवतात. त्या घरातल्या स्त्री-पुरुषांनी आनंदानं स्वागत केलं. भराभर सगळी जमा झाली. पुदिन्याची चटणी सफरचंदाच्या फोडींना चोळून ती बशी आम्हाला दिली आणि चहा. चपट्या नाकाची, सुजीर डोळ्यांची पण तुकतुकीत कांतीची बायकामुलं! किती किती लांब अंतरावर असणाऱ्या शाळेत, ही मुलं पहाडांतल्या कठिण वाटेनं जाताना पाहून फार कौतुक वाटतं. 'सिर्खा'मधे दहावीपर्यंत शाळा आहे. पाठीवर छोटं मूल बांधून बायका देखील अशा वाटेनं कामासाठी जातायेतांना बघून अतिशय कौतुकमिश्रित आश्चर्य वाटलं.

## लावण्यसुंदर मस्तकीं बाळा

सोमवारी 'गाला'साठी निघालो. आजचा प्रवास तेरा किलोमीटरचा चढाईचा जास्त होता. चढणे, उतरणे, परत चढणे – जणू एकदा पाताळापर्यंत उतरल्यानंतर चढण स्वर्गापर्यंत; की पुन्हा खाली वाहणाऱ्या नदीपर्यंत उतरायचं. वाटेत हे डोंगरातून झुळझुळ वाहाणाऱ्या पाण्याचं मधुर संगीत – छान सोबत करीत होतं. आजची सोमवारची आरती वाटेनं म्हणताना, 'लावण्य सुंदर मस्तकी बाळा तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा' या ओळीचा खरा अर्थ ध्यानात आला – नव्हे अनुभवायला आला. कैलासनाथाच्या माथ्यातून निघणारं हे जीवनदायी जल – अहो, म्हणून त्याचं मस्तक लावण्यमय, नाही का? ते झुळझुळ संगीत देणारं लावण्य नयनाला आल्हाद देणारं, एकसारखं पाहावसं वाटून – डोळ्यांत साठवलं जाणारं – 'त्या'च्या स्वरूपाचं दर्शन देत होतं. याहून देवदर्शन वेगळं कोणतं? इतकं उदात्त, भव्य रूप – जे आपोआप नतमस्तक बनवत होतं, गप्प करत होतं, न ठरवतां आंतून 'ॐ'चा उच्चार उमटत होता. ओहो हो! शब्दातीत अनुभव आहे हा! किती भाग्यवान आम्ही!

**यही पोस्ट है।**

असा निसर्ग अनुभवता अनुभवता साडेबाराला 'सिमखोला' गावी चहाला थांबलो. इथे आमचे लियाजन ऑफीसर 'श्रीवास्तव' आणि त्यांच्या बरोबरच्यांना आमच्या या वयातल्या (चौसष्ट आणि अडुसष्ट) चालण्याचं खूपच कौतुक वाटलं. त्यांनी एकदम आम्हाला, 'वूमन ऑफ दि मॅच' आणि 'कपल् ऑफ दि मॅच' बनवून टाकलं.

इथे चहा पिताना, आमच्यातल्या गप्पांत, आता घरी पत्र लिहिलं पाहिजे – अशा गप्पा ऐकून, तो हॉटेलवाला म्हणाला, 'खत लिखना तो इधरही लिख दो न! यही पोस्ट ऑफीस है, कलही ये खत इधरसे जायेगा और आठ दिन के बाद बम्बईमें घरपे मिलेगा।' म्हटलं "कहाँ है पोस्ट ऑफीस?' तर गंमत म्हणजे हॉटेल आणि पोस्ट ऑफीस एकच होतं आणि प्रत्यक्ष चहा करणारा तोच पोस्ट मास्तर होता. एवढं हसू आलं. मग त्याच्या आग्रहाखातर तिथे एक कार्ड लिहिलं – आमच्या डॉ. मिलिंद भागवतला – नी मग निघालो. आणि दोन वाजता 'गाला' मुक्कामी पोचलो.

**गाला-बिच्छू घास**

आज प्रथमच इथे सगळ्यांनी मिळून पाऊण तास भजने वगैरे म्हटली. वेळ छान गेला संध्याकाळचा!

आजपर्यंत या पहाडातून जाताना जाणवत होतं, कितीएक प्रकारच्या वनस्पती आपल्या अंगावर वागवल्यात यानं! एकदा मजाच झाली. वाटेत एका वनस्पतीला माझा हात लागला आणि एकदम जोरात 'ओय् ओय्' करत झटकून मी हात मागे घेतला. गांधीलमाशी वगैरे चावल्यासारखा झटका आला एकदम! झिणझिण्या येऊन 'हाय्' करत जागीच उभं राहावं लागलं. घोडेवाला म्हणाला, 'ये बिच्छू-घास है, ऐसेही काटते हैं, थोडी देरसे ठीक हो जायेगा!' मी तर घायाळ झाले होते. म्हटलं, 'अरे लावू काय त्याला? मला सहन नाही होत'. तर म्हणतो, 'नाक में पानी है वो लगाव.' मला अजबच वाटलं. मनात आलं 'हे' जसे जखमेला थुंकी लावायला सांगतात, तसलाच प्रकार सांगतोय् हा. तो म्हणाला, 'यही पहाडी दवा है उसकेलिये!' पण नाकात पाणीच नव्हतं, तर दवा कसा करणार? खरंच थंडीनं कोरडं ठणठणीत नाक झालं होतं – दवा कसा करणार? मग सहन करत राहिले, पण काय सांगू, थोडा वेळ गेला तरी काही बरे वाटेना, चांगले दोन तास जावे लागले आणि नंतरही त्या सुजलेल्या

करंगळीला रात्रीपर्यंत झिणझिण्या येत होत्या. 'बिच्छू-घास' हे नाव वनस्पती सार्थ करीत होती. विंचवाप्रमाणे खरंच विषारी होती ती. असंच आणखी एक झाडही मग पाहायला मिळालं. गुडघ्याएवढंच. त्याला टपोऱ्या लाल दाण्याची कणसं – दिसायला अत्यंत सुंदर-मोहक – पण म्हणे अतिशय विषारी! अशीच काही करवंदाच्या जाळीसारखी. त्यावर थेट करवंदासारखीच पण रंगानं लाल फळं – हीही विषारीच, निसर्गाच्या किमयेची ही मात्र कमाल वाटली. सुंदरपणात इतकं जहरी विष? जणू विषकन्याच!

## धूप – मूळरूपात!

पण त्याउलट वेगळ्या गुणधर्माची वनस्पतीही दिसली पुढे – सुवास दरवळत होता. मी दीर्घ श्वासांत तो साठवत होते. आजूबाजूला वेध घेत होते. अरे, आसपास एखादी 'योजनगंधा' तर नाही? इतक्यात घोडेवाल्यांनी – काही झुपके काढून आणून दिलेन्. म्हणाला, 'हे उन्हात सुकवायचं, नंतर जाळायचं' – अहो, 'धूप' होता तो! वा! वा! कैलासनाथांनी, आपल्या स्वत:च्या पूजेकरतां हीही वनस्पती वागवलीय् अंगावर. त्या विषारी वनस्पती म्हणजे जणू काय अमृतमंथनांत त्यानं पचवलेलं विष असं मनात आलं.

## वनस्पतींची भावभंगिमा

आणखी कितीतरी वनस्पती हो! लाखोनी असलेली! – फुलझाडं तर किती प्रकारची नि रंगाची! बुटकी बुटकीच – काहीना वासच नाही. पण तऱ्हा इतक्या – फक्त पांढऱ्या रंगातच किती प्रकार – काही गुच्छांची – एकेक वेगळ्या फुलांची – काही पाच – काही सात पाकळ्यांची! काहीओंजळीसारख्या आकाराची, काही अर्घ्य दिल्यासारख्या खाली वाकलेल्या आकाराची – म्हटलं – कैलासपतीला आचमन करून अर्घ्य देताय् का? द्या द्या!! त्याउलट काही आत वळलेल्या पाकळ्यांची – ही जणू ध्यान लावतायत!

निळ्या-कोनफळी रंगात शेड्स् एवढ्या की विचारू नका! व्हॉयलेट रंगाची गोडगोड फुलं पाहिली की, अंजनीची आठवण यायची. हा रंग तिचा खूप आवडता, नुकतीच त्या रंगाची हजार बुट्यांची साडी तिनं खरीदलीय्. एक तर, जमिनीलगत टिकल्यांएवढ्या छोट्या फुलांची झाडं, जणू डाळिंबी खडीचं वस्त्र भूमीवर अंथरलंय्.

## जीव मुठीत धरून!

दुसरा दिवस मंगळवारचा, चोवीस ऑगस्टचा. हा दिवस मात्र परीक्षा पाहाणारा ठरला. आजची चालण्याची वाट खूपच कठिण होती. एकदम पहिली चढण बरीच आणि उतरण इतकी कठिण की घसरून खालीच पडू की काय? चढण म्हणजे एकेक सुळके नि काही ठिकाणी 'तीव्र ढाल याने एकदम उतार' नि अरुंद वाट! आजदेखील जणू पाताळ नि स्वर्गापर्यंतचा कठिण चढउताराचा प्रवास अत्यंत खडतर-धाडसाचा-बिकट असा चालला होता. आव्हान दिल्यासारखा! हड्डी नरम होत होती. आधीच्या ग्रूपचा, सामानाचा एक घोडा या इथे नदीत पडला म्हणून कळलं. या भलत्याच कठिण वाटेतून जाताना भीतीनं अन् नाही म्हटलं तरी जीव मुठीत धरूनच, त्या ओंकाराचं नामस्मरण करीत, त्याच्यावरच भरवंसा ठेवून, पार करत होतो मार्ग.

मुक्कामावर आल्याबरोबर जी आडवी झाले, ती जेवायलासुद्धां उठावंसं वाटत नव्हतं, पण भूकही गप्प बसू देत नव्हती; अखेर थोड्या विश्रांतीनंतर जेवण घेतलं. पुन्हा झोपले. सगळेचजण आज झोपले होते. संध्याकाळी मात्र सगळे पुन्हा ताजेतवाने झाले. हवा सुखद थंड होतीच. वाशीकरांची आठवण झाली. ते म्हणाले होतेच की 'मालपा' आणि 'बुधी' अतिशय कठिण आहेत.

आज वाटेत नदीचं वेगळंच रूप दिसलं. सतत बाजूंनी घोंगावत जाणं चालू होतं. रुंद पात्रांनी आणि दुधाळलेल्या पात्रांनी इतकी घाईघाईत सर्पाकृती गतीत जणू कुणाला महत्त्वाचा निरोप द्यायला निघाली होती. वाटेत कुणाकडे म्हणून लक्ष द्यायलासुद्धा तिला वेळ नव्हता. नंतर लक्षात आलं, निरोप कसला — अहो प्रियकराला भेटायलाच चालली होती की ती! सागराच्या मीलनाला केवढी उत्सुक नि आतुरतेने निघाली होती! ही तिची लगबग घाई गडबड — खरंच देखणी होती.

## चंद्र — त्याचं उमलणं!

संध्याकाळी ताजेतवानं झाल्यावर जरा बाहेर आले — तर इतक सुंदर दृश्य हो! ही विलक्षण संध्याकाळ कधी कधी विसरणार नाही. कसं सांगू हो? हुडहुडणाऱ्या थंडीत — हांकेच्या अंतरावर समोरच्या पहाडातून चंद्र उमलत होता — इतका जवळून — इतका जवळून त्याला उगवताना पाहिला. सुरुवातीला 'अर्धचंद्रा'चं पहाडातल्या वृक्षातून जणू शीतल तेजाचं ते प्रफुल्ल सौंदर्यमय फूल उगवताना — उमलताना पाहताना, मन खरच उचंबळून आलं.

घाईघाईनं ह्यांना हांक मारली – ते कॅमेऱ्यात टिपण्याकरतां – पण हे येईपर्यंत, ते पूर्ण उमललेले चंद्रफूल तेवढ्यात अर्धं ढगांनी व्यापलं गेलं. इतक्या जवळून हे उगवणं पाहताना आनंदानं शहारून गेले मी, नि मनात आलं, बाल श्रीरामानं नक्की हेच दृश्य पाहिलं असेल अन् मग साहजिकच त्यानं 'चंद्र हवा'चा हट्ट केला असेल. गळ्यातून आपोआपच स्वर ओघळायला लागले. 'रामाला ग चंद्र हवा... चंद्र हवा'! अगदी थोड्या क्षणांसाठी झालेला तो प्रत्यक्ष देवत्वाचा साक्षात्कार! अनुभवलं की, असा साक्षात आकार प्रभू काही क्षणापुरताच दाखवत असतो. तो अनमोल ठेवा, नयनांच्या कुपीत, आतल्या कप्प्यात अगदी जपून ठेवला.

# आव्हाने आणि अनुसंधाने

## बिकट वाट वहिवाट असावी !

दुसऱ्या दिवशी, अशाच खडतर वाटेची मनानं तयारी करून, पावणेसहाला, 'बुधी'साठी प्रस्थान ठेवलं. जरासे चालतो की नाही, तोच पाऊस सुरू झाला. हवा एकदम थंड झाली. पटापट रेनकोट, रेनचीटर, पॅन्ट वगैरे घातले. तो जामानिमा होईपर्यंत थोडेसे भिजलोच. आज मात्र मग घोड्यावरूनच जायचे ठरवले. कारण मुख्य मानस व कैलास साठी शक्ती राखायची होती. काल सतत साडेसहा तास बिकट वाट चालून, भलताच थकवा आला होता. कैलासनाथ जणू आमची परीक्षाच पाहात होता. हे व्रत कठिण आहे असंच जणू सुचवत होता. कितीही कठिण किंवा अशक्य सुद्धां वाटलं, तरी ह्या अर्ध्यावर आलेल्या, पहाडी निर्जन मार्गी करतो काय ? सासूबाईच्या छोट्याशा गाण्याची आठवण आली.

"करू मी कशी ? केलंच पाहिजे !
नाचू मी कशी ? नाचलंच पाहिजे !"

त्या म्हणायच्या 'सुमति, संसार असा असतो, पुढ्यात येईल त्याला तोंड दिलंच पाहिजे. नव्हे द्यावंच लागतं.' हे आठवल्यावर, 'पंगु लंघयते गिरिम्' पण ध्यानात आणलं. म्हटलं – आपण तर हातीपायी धड आहोत – नक्कीच तरून जाऊ. शिवाय इथेही ह्या पहाडी कठीण मार्गांत – पंढरीच्या वारीसारखा अनुभव पुन्हांपुन्हां येतोच आहे की ! प्रभूनं किती किती शक्ती दिलीय् तुमच्या अणूरेणूत. करा त्याचा उपयोग. वापरा ती आणि जा तरून हे कठिण व्रत ! नाहीतरी

'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने'

तेव्हा प्रभूनं दिलेल्या त्या शक्तीवरच तर 'मालपा'पर्यंत आलो होतो ना ! आता पुढच्या अधिक बर्फाळ हवेतल्या मार्गात पण तीच तारून नेईल.

## नवी चेतना

रेनकोट, रेनचीटर्स वगैरेनी सज्ज होऊन घोड्यावर स्वार झालो. जणू शिवछत्रपतींचे मावळे हिमालय सर करायला सज्ज झाले. एक वेगळीच चेतना जागी झाली. आपली ही प्राचीन, सनातन तीर्थक्षेत्रे, भारताने चीनकडून, वेळेला

आक्रमणसुद्धा करून, आपल्या ताब्यात घेतलीच पाहिजेत. आमच्याच या 'तीर्थक्षेत्रां'साठी 'चीन'ची हांजी हांजी करायची. परवाने मागायचे – त्यांनी अमुकजणांसाठीच ते द्यायचे – हे काय म्हणून चालवून घ्यायचं? आमचंच आहे ते आम्ही घेतलंच पाहिजे – घ्यायला हवं. आमचं लष्कर तर सुसज्ज आहेच. – आम्ही सामान्यांनी, एकजुटीने एकादिलाने त्यांच्यामागे शक्ती उभी केली पाहिजे. शासनाने कुणाचाच तेजोभंग करू नये.

जिथे व्यास-पराशर-भृगु-वसिष्ठ वगैरे अनेक मुनींनी तपश्चर्या केली, त्या आमच्या माननीय पूर्वजांमुळे पावन झालेली भूमी आमच्याकडे नको का?

## 'बुधी'कडे जाताना

'बुधी'च्या कठिण आणि पावसातल्या प्रवासाला सुरुवात झाली. पावसाने अखेरपर्यंत आज पाठ सोडली नाही. कठिण चढउतार तर सोडाच; पण आज पावसामुळे चिखल, त्यात अगदी अरुंद वाट, तोल गेला तर पाताळांतच! एक-दोन ठिकाणी तर वाटेतच नाला तयार झालेला; वरून डोक्यावर पडणारे धबधब्यासारखे पाणी – बाजूला खोल दरीतून रोरावत जात, रौद्र स्वरूप धारण करून, रुंद पात्रांनी, खडकांवर जोराने आपटत, फेसाळत जाणारी भयानक नदी – दगडांवर पाय देत देत घोडेवाल्याच्या मदतीने कसेबसे ते नाले पार केले. नदीने मात्र ह्यावेळी भलतंच रौद्र रूप घेतलं होतं. चवताळलेल्या नागिणीसारखी फूत्कार टाकत, वरच्या कड्यावरून एकदम खाली आपटत राक्षसिणीसारखी, खायला आल्यासारखी, भीतीदायक, बेफिकीर, बेपर्वा दिसत होती, पार गाळण उडाली होती. आज सुखरूप पोचणार का – कसे नि कधी पोचणार? वाट संपतच नव्हती. कितीतरी वेळ चालत राहिलो होतो. आडवळणे, नदी पार करणे संपेचना. केव्हातरी एकदाचा लांबून कॅम्प दिसायला लागला. घोडेवाला धीर देत होता. 'आलंच जवळ' म्हणत होता, पण अनुभवाने माहीत झालं होतं की, ह्यांचं 'जवळ आलंय्' म्हणणं, म्हणजे अजून कितीतरी किलोमीटर असतंच. मला एकदम कसंसच व्हायला लागलं. घोड्यावरच, पुढे मान टाकून झोपावेसे वाटायला लागलं. तेवढ्यात नशिबानं एक लहानसं वस्तीचं ठिकाण आलं. मी कोलमडायला लागलेली पाहिल्यावर, घोडेवाल्यानं मला चतुराईने उतरवलं, चहाच्या त्या मिरमुटल्या हॉटेलच्या बांकड्यावर मी आडवीच झाले – काही क्षण भान नव्हतं. घोडेवाल्यानं मग चहा पाजलान्. पुन्हा धीर दिलान्; हे पुढे गेले होते थोडेसे – त्यांना थांबायला सांगून मागे आणलंन्. मग

ह्यांनी ड्रायफ्रूट्स वगैरे दिली. जराशानं बरं वाटल्यावर पुन्हा मार्गक्रमणा सुरू झाली. भुकेमुळेच बहुतेक झालं कसंसं! मग पुन्हां बऱ्यापैकी रपेट सुरू होऊन एकदांचे संध्याकाळी मुक्कामावर पोहोचलो. सगळेजण लगेच आडवारलेच. तरले असले तरी रडकुंडीच होती. दम निघाला होता प्रत्येकाचा. चेहरे तर एकेकाचे पाहण्यासारखे होते.

या वाटेनं येताना अगदी पहिल्या चहाच्या ठिकाणी – चहावाल्याचं, गुहेसारखं घर मी आत जाऊन पाहिलं. निसर्गानं कोरून दिलेलं घर, शिवथर घळीतल्या गुहेची आठवण झाली. आतल्या पलंगावर मेंढीचं कातडं पसरलं होतं. चहावाल्यानं माहिती पुरवली. ह्या कातड्यावर झोपण्यानं कमरदुखी किंवा स्नायूचं दुःख नाहीसं होतं. त्याच्याकडून – पुढच्या थंडीत तरण्यासाठी – मी 'सरसोंका' तेल मागून घेतलं. त्याचा खूप उपयोग झाला.

उद्या विश्रांती असती एक दिवस तर बरं झालं असतं, असं वाटत असतांनाच, वेळापत्रकाप्रमाणे निघावंच लागलं. आज सोळा किलोमीटर अंतर कापायचं होतं. गुंजी गाठायची होती. पण आज इतकीशी कठिनाई नव्हती. तरीही 'बहुत तकलीफ हुअी। धूप भी लगी और इतने देर घोडेपे बैठनेसे भी कंटाला आया।'

**कुमाऊँ मंडळाला धन्यवाद**

पण एक छान आहे. कुमाऊँ मंडळ राहाण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था उत्तम आणि प्रेमानं करतात. काळजी घेतात. पोर्टर्स-घोडेवालेसुद्धां – सर्व तऱ्हेची मदत करतात. अगदी सामान बांधून देण्यापासून ते बूट काढणे-घालणे, वेळेला पाय चोळून देणे – अर्थात् आम्ही ही सेवा त्यांच्याकडून घेतली नाही. पैसे दिले तर कपडे धुवून देतात. आज आम्ही शुक्रवारी 'गुंजी'त आलो होतो. इथून जास्त लष्कर आमच्याबरोबर यापुढे असणार आहे – लिपू खिंडीपर्यंत सरहद्दीच्या जवळचा टापू असल्याने तशी गरजच असते म्हणे! 'गुंजी'ला रोजच्यापेक्षां आराम होता. झोपही मस्त लागली – तशी रोजच लागत होती – पण आज झोपतांना आनंद होता, की उद्या पहाटेला निघायचं नव्हतं. उशीरानं साडेसातला निघणार होतो.

# हिरवी हुरहूर आणि हिमालय

## घरचं देवघर आठवलं

अठ्ठावीसचा शनिवार. ताजेतवानेपणानं उठून सर्व आटोपलं. आज घाई नव्हती निघायची म्हणून वेळ मिळाल्यानं – घरच्यासारखं, दोघांनी मिळून, देवाचं रोजचं सर्व म्हटलं सावकाशीने! इतकं छान वाटलं. म्हणतांना डोळ्यांपुढे घरचं देवघर, सगळे देव, त्यापुढची रांगोळी, धूप, तेवतं निरांजन, अंजनीनं निघताना घातलेला व तोच देवाला वाहिलेला हार – कसं सुंदर चित्र तरळत होतं. या यात्रेत – कां कुणास ठाऊक मधूनमधून घर आठवतंय्. पंढरपूरच्या पायी वारींत असं होत नाही. हा फरक जाणवतोय्, पण ह्या अनुभवाचं विश्लेषण मात्र करता येत नाहीये.

वाटेनं जाताना लष्कराचा जवान सांगत होता. ह्या सरहद्दीवर 'दुष्मनोंके बारेमे जागरूक रहना है, इसलिये जादा व्यवस्था है।' यात्रींमध्येच सामील होऊन, काही वेळा शत्रू जात असतात. कालच चारपाच जणांना म्हणे पकडलं होतं. डोळे बांधून नेतांना काल जो एकजण पाहिला, तो त्या पकडलेल्यापैकीच होता. आजपासून, सगळ्यांनी मिळून एकापाठोपाठ जायचं होतं. सर्वांत पुढे, मध्ये आणि सर्वांत पाठीमागे असे लष्कराचे जवान असणार होते. त्यांच्या आज्ञेप्रमाणेच, पुढचा लिपू खिंडीपर्यंतचा मार्ग आक्रमायचा आहे.

## नयी डांग : ॐ पर्वत

'गुंजी'हून नंतर 'कालापानी'हून सकाळी 'नयी डांग'ला पोहोचलो. तोच सगळे पठारासारख्या भागावर ॐ पर्वत पाहायला जमा झाले. मागच्या डोंगराच्याच कट्ट्यावर बसून किंवा तिथेच उभे राहून, समोरच्या पर्वतावरचा बर्फाचा ॐ चा आकार बघणार होतो. हा आकार काही तासापर्यंत राहातो. ते हवेवर अवलंबून असतं. ढग कसे जमतील, जातील – सर्व त्या निसर्गावर अवलंबून! ढग जातात कधी व तो स्वच्छपणे दिसतो कधी अशी वाट सारेजण डोळ्यांत तेल घातल्यासारखे पाहात होते. ध्यान लावल्यासारखे – सर्वजण समोर तो उमटत असलेला स्पष्ट होत असलेला 'ॐ'; शिवाचं ते रूप पाहाण्याकरतां टपले होते. सगळ्यांचे कॅमेरे सज्ज होते. आपण पाहाणार

असलेली ही निसर्गाची किमया – इतरांनाही दाखवता यावी, त्यांच्याही डोळ्यांचं पारणं फिटावं म्हणून, सगळेजण कॅमेराच्या कुपींत ते रूप तंतोतंत पकडता यावं – म्हणून आटापिटा करून – नेमका क्षण पकडणार होते. थोडासा ढगांचा अडथळा सोडला तर सगळ्यांना तो ॐ डोळे भरून पाहायला मिळाला, कॅमेऱ्यांत टिपायला मिळाला. सगळेजण एका विलक्षण, वेगळ्या आनंदाच्या धुंदीत होते. जणू आज त्यांच्या डोळ्यांचं सार्थक झालं होतं.

**पर्वत की ऋषी**

गरम कपड्यांत गुंडाळलेली आम्ही सर्व माणसं भोवतालून वेढणाऱ्या पहाडांच्या कुशीत जणू सुरक्षित होतो. त्या पहाडांचं रूपलावण्य डोळ्यांत साठवत होतो. निमिषभर सुद्धां पापणी मिटू नयेसं वाटत होतं. हे पहाडवर्णन कसं करू? वाटतं, असमर्थ आहे मी! एकेक पहाड – ओळीनं सात असे एकेक सुळके उभे की वाटावं – आमचे सप्तर्षीच जणू अजूनही तपश्चर्येत गुंग आहेत. हे कश्यप – हे भारद्वाज – हे अत्रि – हे विश्वामित्र, हे वसिष्ठ गौतम, जमदग्नि आणि त्यांतल्याच एका पहाडांत असलेली मोठी पोकळी – जणू त्या सर्वांची गुहा! राहाण्याचं ठिकाण! 'जिथे दिवसभराच्या चिंतनानंतर ते जमत असतील, एकमेकांचे विचार मांडत असतील व आपापले सिद्धांत – जगाच्या कल्याणाकरतां विश्वापुढे उलगडत असतील.' दुसरे ओळीनं तीन पहाड – तीन रंगांचे – एक मातकट, एक शेवाळी, एक निळसर हिरवा – काय रंगसंगती! पहाड असे पुढे मागे कप्प्याकप्प्यासारखे, -- जणू त्यांच्या रचनेवरून इंटिरिअर डेकोरेटर्सनी डिझाईन काढावं.

फार आनंदांत-समाधानांत गेला आजचा दिवस, पण ऊन आणि थंडी अशा हवेनं म्हणा किंवा एकंदर आजवरच्या प्रवासामुळे म्हणा, सर्वजण थकले तर होतेच, पण कुणी कुणी काही प्रमाणात आजारीही होते. पुढील विरळ हवेतल्या जादा थंडीच्या प्रवासाची नाही म्हटलं तरी थोडी धाकधुकही वाटत होती.. औषधपाणी चालू होतं. धीर देणं चाललं होतं. देवाच्या भरवंशावर सर्व अवलंबून आणि विश्वास ठेवून होते.

**सामानाचे सुरूक्-सुरूक्!**

दुपारी पाचलाच सगळं सामान आज बांधायला सांगितलं होतं, तीही गडबड सगळ्यांची चालली होती. ह्या सामानाच्या बांधाबांधीच्या वेळची रोजची एक गंमत बरं कां! सगळ्यांच्या प्लॅस्टीकचे चुरचुर आवाज सतत व्हायचे – तसेच

बॅगांच्या झीपस्‌चे 'सुरूक्‌-सुरूक्‌'! सारखं मेलं उघडायचं, बंद करायचं. किती आठवणीनं केलं तरी, काहीतरी राहिलं की काय हे दडपण मनावर असायचं आणि राहिलं काही तर वाटेत पंचाईत होणार. रेनचीटर वर ठेवलाय ना? विन्डचीटर बॅगेत मावतोय्‌ ना? स्वेटर एक असूं दे की दोन? शालीची आज जरूर लागेल का? ओले झाले तर हातमोज्यांचा जादा जोड हाताशी आहे, ना? एक ना दोन हजार गोष्टींनी मन गुदमरलेलं असायचं. त्यांत हे सर्वांच्या सामानाचे सुरूक्‌-सुरूक्‌ आवाज नी प्लॅस्टिकची चुरचुर ऐकतांना मजा वाटायची. शिवाय बाकीचे झोपलेले वगैरे असले तर त्या शांततेत एवढंसं जरी कशातनं काही काढायचं म्हटलं, तरी हे आवाज होतील म्हणून अवघड वाटायचं.

'नयी डांग' हे आपल्या हद्दीतलं शेवटचं ठिकाण. इथून लिपूलेख खिंड आणि लगेच तकलाकोटला चीनमधे प्रवेश! इथून रात्रीच साडेतीनलाच निघायचं होतं. थंडी 'मी' म्हणत होती. अडीच तीनलाच उठून निघायची तयारी चालू होती. तोंड धुवायला न्‌ संडासला गेले तेव्हा माझ्या तर कपाळातच थंडी शिरली. माकडटोपी घालायची राहिली हाती. ती लगेचच घातली. गर्द अंधारात आज निघायचं होतं. अक्षरश: समोरचं माणूस दिसत नव्हतं. तशात सगळे तयारीनिशी आले. घोडेवालेही घोडे घेऊन आले. काळोखात माथुर बाईंच्या घोड्यानं मला जरा ढकललं बसले होते तिथून. नशीबानं फारसं लागलं नाही.

काळोखाच्या साम्राज्यांत, बॅटऱ्यांच्या उजेडांत, एकेक घोडेस्वार आणि पायी जाणारे पाठोपाठ चालले होते. दिवाळीत पणत्या लावाव्या, तसा बॅटऱ्यांचा उजेड ओळीनं लुकलुकत होता. डाव्या बाजूला पहाड, उजव्या बाजूला नदी, आणि मधल्या अरुंद वाटेवरून सगळे ओळीनं मुक्यानं – भीतीच्या दडपणानं जणूं मौनयात्री झाले होते. उजाडतं कधी याची प्रत्येकजण वाट पाहात होता. तरीसुद्धा साडेपाचशिवाय उजाडलं नाही. थंडीशी सामना करत सारे मार्ग आक्रमत होतो. मग जरासं उजाडतांना एका पठारावर आलो, तिथं थोडी विश्रांती दिली. हातापायाची बोटं गारठली होती सगळ्यांची! मग त्या पठारावर एकेकजण उड्या मारणे, हातपाय चोळणे, जागच्याजागी लेफ्टराईट करणे, ड्रीलसारखे व्यायाम करणे – वगैरे प्रकारांतून – अंगांत उष्णता निर्माण करण्याचा व निभावण्याचा प्रयत्न करत होते.

आज माझा पडण्याचाच वार होता बहुतेक. आधीच कडाक्याच्या थंडीनं बेजार झालेली. घोड्यावरून उतरून, एका मोठ्या दगडावर बसतांना, सपशेल गुडघ्यावर बसल्यासारखी पडले. चेहराच एकदम जमिनीवर आपटला. ओरडायलाही जोर नव्हता. वाटलं नाक चपटंच होऊन गेलं आपलं. नशीबानं माकडटोपी आणि नाकालाही स्कार्फ असल्यामुळे जखम झाली नाही. पण इतकी धडधड झाली! कुडकुडत होतेच. अखेर ह्यांच्या खांद्यावर मान टाकली. काही न बोलता तशीच पडून होते. ह्यांना माझी काळजी लागली. कारण अजून तीन तास तरी घोड्यावरून जायचं होतं. मी नीट बसू शकेन ना?

कशीबशी मी चालले होते घोड्यावरून. पुढे ऊन पडल्यावर जरा ठीक प्रवास झाला. पण तेही इतकं भराभर वाढलं की, तेही सोसावंच लागलं. लिपूलेखपर्यंतचा पठारापासूनचा रस्ता मात्र सीधा साधा होता. बाजूला पहाड किंवा नदी वगैरे नसल्यामुळे भीतिदायक नव्हतं.

# लंघन आणि सीमोल्लंघन

**सरहद्दीवर**

त्या बॉर्डरवर आल्यावर मात्र तासभर जवळजवळ उन्हात एवढ्याशा जागेत सगळ्यांना बसावं लागलं. इथे आधीची बॅच परतणार असते. त्या यात्रीचे चीनमधले घोडे आम्हाला, आमचे त्यांना अशी बदलाबदल होणार असते. सामानदेखील सगळ्यांचे या घोड्यांवरून त्या घोड्यांवर चढवायचे असते. सर्वजण असे कंटाळले-दमले-थकलेले. मला तर पित्त व्हायला लागलं. एकदाचे त्या खिंडीतून खाली उतरलो. चीन हद्दीत काही अंतरावर घोडे होते. जायला सुरुवात झाली. इथे घोडेवाल्या बायका होत्या. मुख्य नायक पुरुष होते. वाटेनं मात्र मला व 'साधना सोदी'ला पित्ताचा त्रास झाला. तिला उलटी झाली. मी घोड्यावरून उतरून, आडवीच झाले रस्त्यावर! ह्यांचा घोडा थांबायलाच तयार नाही. मग पायी जाणाऱ्या 'सुशील अगरवाल'ने मला इलेक्ट्रॉल पाजलं — मग जराशानं साधारण ठीक होऊन घोड्यावर बसले. बरंच अंतर गेल्यावर बसेस होत्या. मग पुढे बसने जायचं होतं — त्यामुळे ह्यांच्या खांद्यावर डोकं टेकता आलं. एकोणतीस ऑगस्टच्या रविवारी दुपारी, चीनच्या 'तकलाकोट'मध्ये प्रवेश केला.

**तकलाकोट**

मोठ्या थोरल्या हॉलमधे प्रशस्त खुर्च्यांवर आम्ही विसावलो. सगळ्यांना कोरी कॉफी दिली गेली. फार छान होती कॉफी. पासपोर्ट-व्हिसा आणि सामान तपासणी, हे सगळे सोपस्कार झाल्यावर आपापल्या खोल्यात गेलो. इथे दोघांच्या-चौघांच्या अशा स्वतंत्र खोल्या होत्या. पण त्यांची म्हणे जेवणाची वेळ होऊन गेल्यामुळे आम्हाला जेवण नव्हतं — सकाळचं!

**निसर्ग आणि 'प्रकृति'!**

मी तर आजारीच होते पित्ताने. पोटात काही नाही — अशक्तपणा खूप — झोपून राहिले होते. स्वतंत्र खोल्यांचा माझ्या आजाराच्या दृष्टीने फायदा झाला. हे व मी एकत्र राहू शकलो. ह्यांना माझे औषधपाणी व्यवस्थित करता आले. शिवाय आज व उद्याही इथे राहायचे असल्यामुळे विश्रांती मिळणार होती. पण ह्यांना नी मला पुढची माझी ट्रिप कशी होणार ही धास्ती वाटायला लागली.

माझ्यामुळे ह्यांची ट्रिप बिघडते की काय? एवढ्या लांबवर खडतर प्रवास करून आलो, तर असं व्हायला नको असं वाटत होतं. मला बोलवतही नव्हतं डॉक्टरीणबाईंनी धीर दिला. गोळी दिली नि म्हणाल्या, पित्तच आहे. संध्याकाळपर्यंत ठीक होईल. मी बरोबर आणलेलं शेंदेलोण लावलेले आले आणि आवळ्याच्या वड्यापण खाल्ल्या. झोपून राहिले.

संध्याकाळी एकदम 'सहा'ला जेवणाची घंटा झाली. पण मला जेवायचंच नव्हतं. ह्यांनी सांगितलं जेवण अतिशय छान होतं. मला खाता आलं नाही म्हणून ह्यांना चुटपूट लागली. भात, टोमॅटो सूप, बटाट्याची परतून भाजी, बीन्सची उसळ, कोबीचे पातळ काप केल्यासारखी भाजी, तांदळाच्या चिकवड्या व संत्री अननसाची फळांची डिश! ह्यांनी माझ्यासाठी थोडी फळं आणली. खरं तर खायची इच्छा नव्हती.

एक लहानशी उलटी होऊन गेल्यावर पित्त कमी झाल. मग रात्री उशीरा ह्यांनी प्रेमानं आणलेल्या फळांच्या फोडी मी खाल्या. कारण ताकद राहायला हवी. माझ्यासाठी शेजारच्या खोलीतल्या 'साधना'ने चहाच्या 'बॅग्ज्'चा चहा करून दिला. तिच्या 'टी बॅग्ज्' व आमची साखर असा चहा बनवला. तो प्यायल्यावर फार बरं वाटलं. 'साधना'लाही कालपासून उलट्या होत होत्या. तिला आमच्या जवळच्या 'पाचक'ने बरं वाटलं होतं. शिवाय, आले किसून मीठ लावूनही तिला दिले होते. आवळ्याची वडीपण. दोघी एकमेकींच्या उपयोगी पडलो होतो. 'संध्या' नावाची एक एअरहोस्टेस बरोबर होती. तिलाही 'पाचक' खूप उपयोगी पडले. नलूला धन्यवाद दिले. (नलू नानल, माझी धाकटी बहीण, प्रत्येक ट्रिपला हे पाचक मला आवर्जून देते. या 'कैलास-मानसच्या' यात्रेची जाहिरात आलेलीही तिनेच मला तत्परतेने फोनवरून कळवली आणि मग आम्ही अर्ज केले होते.)

दुसऱ्या दिवशीच्या, तीस ऑगस्टच्या सोमवारी सकाळी प्रसन्न तब्येतीने जागी होऊन ताजीतवानी झाले. शिवाय आजचा दिवस विश्रांतीचाच होता. पित्ताशिवाय दुसरी काही तक्रार नसल्यामुळे लगेचच तब्येत सुधारली. तेरा वर्षांनी मला पित्त झालं होतं. वयाच्या चाळीशीला पित्त अधूनमधून व्हायला लागलं होतं ते पन्नाशीला आपोआप गेलं होतं. अमसूल, आलं, आवळा, थंड दूध, बर्फ, डाळिंब ह्या उपायांनीच बरं वाटायचं आणि जेवढ्या प्रमाणांत चढलं असेल, तेवढा वेळ लागायचा बरे व्हायला. लक्षांत राहिलेलं पित्ताचं आजारपण

म्हणजे माझ्या वडिलांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशीचं! इतकी शेजारी असून मला हजर राहतां आलं नव्हतं. बाकी सर्व भावंडं होती. रात्री खूप उशीरा बरं वाटलं होतं. त्या रात्री समोर व्यायामशाळेत गणपति उत्सवांत, 'प्रमिला दातार'च्या गाण्याचे कर्णमधुर सूर वातावरणांत पसरले – 'मोगरा फुललाऽऽ' आणि ह्यांना राहवलंच नाही. सुमतीला तिचं गाणं ऐकायला मिळालं पाहिजे आणि आता बरं वाटतंय् तर, वडिलांच्या पाया पडायला पण जाण्याची तिची भावना जपली पाहिजे, ह्या विचारानं मुद्दाम मला हात धरून सांभाळून हे घेऊन गेले. ही ह्यांची प्रेमळ आठवण यावेळी पुन्हा आली.

**नवा दिवस – नवी हौस**

सकाळी आज 'ठीक' झाल्यामुळे गरम पाण्यानं आंघोळ केली. शुचिर्भूत झाले. मग बऱ्याचशा बायका आमच्या खोलीत आल्या. भजने म्हटली. 'सहस्रनाम' म्हटलं आणि मी 'रुद्र' म्हटला.

जेवणानंतर दुपारी लगेच दोन वाजता 'बस'नं आम्हा सगळ्यांना इथल्या बाजारात नेलं. बहुतेकांना 'मानस'सरोवरातलं पाणी घेण्यासाठी कॅन्स् घ्यायचे होते. बाजार फारसा काही नव्हता. शिवाय गव्हर्नमेंटची दुकानं आज बंदच होती. त्यामुळे तसं म्हटलं तर दोन तास कंटाळवाणेच गेले. काल संध्याकाळी 'युऑन' ह्या चिनी नाण्यात सगळ्यांना पैसे दिले गेले. इथे प्रत्येकाने ४०० डॉलर्स भरले होते.

## कैलास आणि मानस – दोन गटांनी आगेकूच

रात्री सातला – 'कैलास-मानस'च्या मुख्य यात्रेचं सर्व मार्गदर्शन झालं. उद्यापासून दोन गट करून जायचं आहे. एक गट 'कैलास'ला जाईल, दुसरा 'मानस'ला जाईल. मग बदलाबदल होऊन सगळे पुन्हा 'झै-दी' या गावी एकत्र होऊन परत तकलाकोटला येऊ. उद्यापासून थंडी कडाक्याची असणार आहे. त्यामुळे जास्तीचे कपडे-हातमोजे-पायमोजे वगैरे सर्व व्यवस्था व तयारी प्रत्येकाने केली.

त्याप्रमाणे मंगळवारी एकतीस ऑगस्टला पहाटे सहालाच मस्त नास्ता करून, मग आठ वाजता बसने 'हौरे'साठी निघालो. आता अधिक कठीण परीक्षा व्हायची होती. आम्ही 'ब' गटात होतो. नऊ बायका व सहा पुरुष असे एका गटात. त्यात 'सुशील' व 'बिपिन' ही दोघं, आमची श्रावण बाळासारखी काळजी घेणारी तरुण मुलं आमच्यात होती म्हणून बरं वाटलं. 'बिपिन'तर आमच्या गटाचा एल्.ओ.च होता. 'अ' गटातले लोक 'हौरे'हून लगेच 'तारचेन'ला 'कैलास'साठी गेले. माझ्या मैत्रिणी, सौ. माथुर, साधना सोदी यांना सोडताना वाईट वाटलं. एवढ्यात धागे पक्के विणले होते. त्यामुळे डोळ्यात पाणी घेऊनच निरोप द्यावा लागला.

तकलाकोटहून निघाल्यानंतर, मधे वाटेंत; लांबून निळ्या पाण्याचे सरोवर दिसू लागले. सर्वजण उत्सुकतेनीं बसमधे, जागीच उभे राहून पाहण्याचा प्रयत्न करू लागले. 'मानस'चं दर्शन घेण्यासाठी आतुर झाले होते सर्वजण। मग समजले कीं ते सरोवर म्हणजे 'राक्षसताल' होते. त्यालाच 'राक्षसह्द' असेही म्हणतात. थोडे अधिक अंतर गेल्यावर आमची बस 'राक्षसताल' दाखवण्यासाठी थांबली. बरेच अंतर चालून जायचे होते. हे सरोवर 'मानस'च्या खालोखाल मोठे सरोवर आहे. ह्या सरोवराच्या कांठी लंकाधिपति रावणानें खडतर तपश्चर्या केली होती. व आत्मलिंग प्राप्त करून घेतले होते म्हणून राक्षसताल या सरोवराचे पाणी कोणी पीत नाहीत – आचमनसुद्धा करत नाहीत. अशी एक दंतकथा सांगितली जाते कीं ते आत्मलिंग उचलतांना रावणशला अतिशय घाम फुटला

व घामाचे पाणी सरोवरांत गेले. म्हणून ते पाणी अशुद्ध, खरें तर रावण महान निश्चयी. त्याचे तपही खडतर परंतु पाहीजे ते प्राप्त झाल्यावर तो उन्मत्त होऊन, त्याचे हेतू स्वार्थी ठरले. तप:सामर्थ्याचा त्यानें दुरूपयोग केला. म्हणून त्याच्या क्रियेस हीनपणा आला. आणि जणूं काहीं ते सरोवर विटाळले गेले.

हे सारे आधी कांहीच माहीती नव्हते. पण तरीसुद्धा एक अनुभव असा आला कीं, 'मानस' नजरेच्या टप्प्यांत आल्यावर, जसं उचंबळून येणं किंवा एकदम सारे सात्त्विक भाव फुलून येणं किंवा नतमस्तक व्हावसं वाटणं – वगैरे भावनिक प्रकार इथे कांहीं झाले नाहीत किंवा मनाची तारही छेडली गेली नाहीं. असो.

'होरे'ला जवळजवळ अडीचला आलो होतो. आजपासून जेवण आमचं आम्ही करायचं होतं. थोडा वेळ स्टोव्ह मिळणार होता. तेवढ्यात 'फास्टफूड' काहीतरी बनवायचं. मी आणि उत्तरा देवनी 'खिचडी' केली. 'सुरभि' व 'रश्मि'ने नूडल्स व सूप बनवले. मी नेलेल्या गुळाच्या पोळ्या, साजुक तूप, असे जेवण सर्वांनी जवळ जवळ चार वाजता केले.

इथे जेवण बनवणं तसं कटकटीचंच आहे. कारण स्टोव्ह म्हणजे 'वेल्डींग'च्या वेळी वापरतात तसा! भांडी हलकडी ॲल्युमिनिअम्‌ची, त्यामुळे पदार्थ ढवळायला लागलं की डळमळतात. मग एकीनं चिमट्यानं पकडायचं दुसरीनं ढवळायचं असा प्रकार करावा लागतो.

थंडी भराभरा वाढत होती. उद्या पहाटे साडेपाचला निघायचे असल्यामुळे संध्याकाळीच सामानाची बांधाबांध झाली आणि रात्री फक्त 'सूप'च घेऊन सर्वजण 'चिडीचूप' झाले पांघरुणांत.

**एक सप्टेंबर**

पहाटे 'चार'लाच उठून एक सप्टेंबरच्या बुधवारी 'मानस'सरोवराच्या प्रदक्षिणेसाठी तयार झालो. पहाटे पहाटे योगिनीनं ओट्स् करून सर्वांना दिले. एक प्रकारची गव्हाची किंवा मक्याची खीरच. सगळेजण तयारीनं बाहेर आलो. इथे बहुतेक घोड्यांचा काहीतरी प्रश्न निर्माण झाला होता. सर्व सामान त्यांच्यावर लादून, प्रत्येकाचा घोडा व प्रत्येकाचे जुजबी सामान हे सगळं ठरवता ठरवता जवळजवळ पाऊण तास गेला. अतिशय थंडीत कुडकुडत, गरम कपड्यांत वेटाळलेले आम्ही पाऊण तास नुसते उभे होतो आपापल्या घोड्याजवळ. ती मुकी जनावरंसुद्धा बिचारी थंडीत, खाली मान घालून मुकाट्यानं अंगावरच्या सामानाचा भार सांभाळत, पेलत, सहन करीत,

चालण्याची कूच करण्याची आज्ञा कधी होते, याची वाट बघत थांबली होती. उत्तर प्रदेशातली खेचरं आणि इथली खेचरं ह्यांच्यांत थोडा फरक होता. भरपूर आयाळ असलेली. गोंडेदार शेपट्यांची व अंगापिंडानेही जरा मोठी अशी इथली खेचरं आहेत.

भल्या पहाटेच्या त्या वेळात मी मग आभाळातल्या चतुर्दशीच्या प्रकाशमान चंद्राकडे बघत बसले. तेजाळलेला पूर्णचंद्र मनाला सुखसमाधान देत होता. मधूनच एखादा ढग यायचा. बाकी सगळं आभाळ स्वच्छ होतं. खरं म्हणजे काल रात्रभर भरपूर पाऊस झाला होता, त्यामुळे आम्ही जरा साशंक होतो की सकाळला हवा कशी असेल म्हणून! पण पहाटे आकाश स्वच्छ होतं. मनात एकदम पुरुषसूक्तांतल्या ऋचा गुणगुणल्या जाऊ लागल्या.

चंद्रमा मनसो जातश्चक्षो:सूर्यो अजायत!

सारं सौंदर्य निरखताना मन निरामय झालं.

**'मानस' – अनंत ऊर्मी**

इतक्यात घोड्यांची सर्व व्यवस्था होऊन पावणेसहाला निघालो तिथून, एकापाठोपाठ एक घोडे व पायी जाणारे! पुन्हा मौन यात्रा! यावेळी रस्ता तर कठिण नव्हता. सरळ वाळवंटातला. मग असं मौन काय म्हणून? मला ते साहवेना. मी मग स्वत:च मोठ्या आवाजात सुरुवात केली भूपाळ्यांना –

घन:श्याम सुंदरा श्रीधरा...
ऊठ राजसा घननीळा...
उठि गोविंदा, उठि गोपाळा...

आठवून आठवून सर्व भूपाळ्या म्हटल्या. इतरांनीही सूर दिले. वातावरण चेतनामय झालं आणि अशी रपेट करता करता, मग प्रथम जेव्हा नजरेच्या टप्प्यात 'मानस' आलं, तेव्हा – ओहोहो, अनंत ऊर्मि ऊचंबळून आल्या, अंगावर रोमांच उभे राहिले हे निळं लावण्य पाहतांना – मांधाता राजानं जिथं तपश्चर्या केली, शिवपार्वतीचं निवासस्थान असलेल्या कैलासच्या पायथ्याशी पसरलेलं ते हे अद्भुतरम्य, दिव्य 'मानस' म्हणजे खरोखर निसर्गाची विलक्षण किमया आहे. ब्रह्मदेवाच्या कल्पनाशक्तीची कमाल वाटते. त्यानं मनापासून निर्माण केलेलं हे अपूर्व लेणं! महाभारतातलं 'बिंदुसार'! याच्या चारी मुखांतून ब्रह्मपुत्रा, सतलज, सिंधू, कर्नाली या पवित्र औषधी पाण्याच्या नद्यांचा उगम आहे. स्फटिकासारखं स्वच्छ, निर्मळ पाणी, स्पष्ट दिसणारा तळ! अक्षरश:

भिंगासारखं स्वच्छ पारदर्शक! पृथ्वीवरील एकमेव नंदनवनच की! मांधाता पर्वताच्या आणि कैलास पर्वताच्या रांगांमधलं हे भव्य सौंदर्य-वैभव! आत एक, बाहेर एक असं काही नाही. त्याच्या सान्निध्यानं आपणही निर्मळ होऊन जातो, निरामय होतो.

**कंटाळवाणा प्रवास**

हळू हळू जरा उशीराच सूर्यदेव वर यायला लागले. सर्व डोंगर अक्षरश: बर्फाने भरलेले. वाटेत रस्त्यावर पण काही ठिकाणी बर्फ विखुरलेले, साधारण साडेअकरापर्यंत वेळ छान गेला. बर्फाळलेल्या डोंगरावर पडलेले सूर्यकिरण, त्यामुळे त्यांना आलेली वेगळीच चकाकी-झळाळी नि थंडगारेगार हवा! मग एका ठिकाणी नास्त्याला थांबलो. घोडेवाल्यांचा स्वयंपाक तिथे झाला आणि एकदीड तासानी पुन्हा निघालो ते सतत साडेपाचपर्यंत जातच होतो. थोडी विश्रांती घेऊन लगेच पुन्हा यात्रा सुरू; ते रात्री नऊ साडेनऊपर्यंत एकदाचे 'चुगू' मुक्कामी पोचलो. हा दुपारनंतरचा प्रवास संध्याकाळनंतर सर्वांना भलताच कंटाळवाणा झाला. रस्ता कठिण नव्हता तरीसुद्धा!

एक तर दिवसभर घोड्यावर बसण्याने कुले व कमर दुखावली. मांड्याही दुखत होत्या. निर्मनुष्य वाटेवरून रखडतच कधी पोचतो अशा अवस्थेत चाललो होतो. यावेळी प्रत्यक्ष सरोवर पण आमच्यापासून दूर होते. त्यामुळे ती शोभाही नव्हती. नंतर मग कसेबसे एकदाचे रात्री साडेनऊ वाजता 'मानस'च्या जवळून जवळून जात, 'चुगू' या मुक्कामी पोचलो. फाटकन् बुटांसकटच आडवे झालो. बूट काढायचीही मला आणि उत्तरा देवला ताकद नव्हती. तिला तर थंडीपण भरून आली. जे पांघरुणात शिरलो ते शिरलो. मग त्या रात्री तरुण मुलींनी बनवलेले नुडल्स व सूप अंथरुणातच घेतले. उठवत नसले तरी भूक लागलेली होतीच. अगदी नको ही यात्रा असे त्या क्षणी झाले.

मराठी ... ग्रंथालय ठाणे
प्र-प्रवास ७८
दा. क्र. २८०८५
१५।७।९५
... शाखा (स्थळ प्रत)

### व्रत करून घेतो शंकर

माझ्या मनात एक गोष्ट सतत आहे. पूर्वी काही वेळा मला सोळा-सोमवारचं व्रत करावं असं वाटायचं. पण साधे उपवासही माझ्याच्यानं होत नाहीत. तर इतके कडक उपवास कसे होतील? उपवास न निभावणं हा एक माझा दोष आहे. मला वाईट वाटायचं. मी म्हणायची, "धोपेश्वरा मी त्याबद्दल तुझा जप दसपटीनं करीन. तू आमचं कुलदैवत ना? मग या प्रकारे केलेली सेवा घे. महिम्न-तांडव, रुद्र वगैरे मी म्हणते. 'नमः शिवाय'चा जप करते."

आणि आता तर ही छान संधी आली. सोळा-सोमवार इतकेच कठिण – किंबहुना त्याहून परीक्षा घेणारे हे 'कैलास-मानस' यात्रेचे व्रत! ही मला मिळालेली संधी – मी हौसेने घेतली. उपास नाही तर नाही, पण या तऱ्हेनं शरीर कष्टवीन आणि तुझ्या परीक्षेला उतरेन. मग मात्र देवा, माझ्या मनातील एक गोष्ट तू करायची. या देही या डोळा मला ती पाहू द्यायची. तुझं ऋण जन्मोजन्मी विसरणार नाही. तुझ्यावर माझा पूर्ण भरवसा आहे. विश्वास आहे. कर्ता करविता तू आहेस म्हणून तर 'शरण तुला भगवंता'!

त्या रात्रीची झोप झाल्यावर मात्र सकाळी ठाकठीक झालो. अगदी प्रसन्न! आज उशीरा निघायचं असल्यामुळे लवकर उठायचं नव्हतं.

### नाना रूपे सृष्टीची

कालच्या परिक्रमेच्या वाटेवरचं बर्फाचं वेगवेगळं रूप नयनमनोहर होतं. अगदी सुरुवातीला, बर्फाच्या चिकवड्याच जणू रस्त्यावर घातल्यासारख्या दिसत होत्या. वितीवितीपेक्षाही मोठ्या, काही ठिकाणी जमिनीलगतच्या झुडुपांवर, जणू बर्फाच्या 'स्टिक्स्' चांदीच्या दिसत होत्या. पुढे पुढे ऊन आणखी थोडं वाढल्यावर जणू साबणाचा फेसच मधून मधून पसरून ठेवला होता व थोड्या वेळानं कुणीतरी येऊन, जणू या साबणानं, भूमी स्वच्छ करणार होतं, धुणार होतं.

मग दुपारनंतर कुठे फारसं बर्फ नव्हतं. जाण्याच्या वाटेवर, कित्येक ठिकाणी, सरोवराच्या अगदी जवळून जात होते, त्यावेळी नयनरम्य शोभा अनुभवत होते. नितळ, स्वच्छ आकाशी पाणी, मंद लाटा, नजर पोचत नव्हती इतक्या लांबवर

पसरलेला सरोवराचा पसारा – समुद्रच होता तो! दुपारी सरोवराचे पाणी गर्द निळे अर्ध्या भागात; थोडे फिके निळे अर्ध्या भागात! सूर्याच्या प्रकाशामुळे हा सारा खेळ होता. पण हे रंग डोळ्यांत साठवताना – धणी न पुरे पाहता – असं होत होतं. यावेळी मी, डॉ. श्रॉफ व डॉ. गोखल्यांची, कृतज्ञतापूर्वक आठवण काढून त्यांना नमस्कार करत होते. त्यांच्या रूपाने माझ्यासाठी देव धावून आला होता. माझे दोन्ही डोळ्यांतले मोतीबिंदू, यशस्वीरीत्या काढून, किती स्वच्छ दृष्टी त्यांनी मला दिली. म्हणून तर नंतरचे प्रवास आणि ही खडतर, कठिणतम अशी यात्रा मी करू शकले ना? डोळाभर सारं पाहू शकतेय् ना? सूर्यदेवाचं डोळ्यातलं तेजच की हे काम पार पाडतंय्! ते ज्या एकमेव शक्तीनं दिलं, त्याच्यापुढे नम्र आहे मी! किती व कशी कृतज्ञ राहू? समजत नाही. देवा, तुझी सतत स्मृती मला राहू दे व अशीच तुझी कृपा माझ्यावर बरसू दे. तुला शत शत वेळा अभिवादन!!!

वाटेनं फोटो घेण्यासारखे खूप होतं. बर्फाळलेले डोंगर, मेंढ्यांचे कळप, लांबलचक आकाराचे केसाळ, भव्य शिंगांचे याक, रानटी पहाडी जमाती..

कैलास पर्वत तर सुरुवातीपासून निरनिराळ्या कोनांतून, वेगवेगळे दर्शन घडवीत होता. कधी उग्र, कधी प्रसन्न, कधी शांत सौम्य आणि बऱ्याच वेळा ध्यानस्थ ऋषीच जणू! असे दर्शन देत देत मग तो मागे राहात होता. आम्ही पुढे जात होतो.

**श्वान आणि कवन**

हो, इथल्या कुत्र्यांबद्दल सांगायला हवं. अहो कसले मोठाले कुत्रे! लांडगेच जणू! दिसले दोन-तीनच! पण 'होरे'या कॅम्पवर जो पिंगट-पिवळा कुत्रा होता, खूप केस अंगावर असलेला, तो तर आकारानेपण जणू सिंहाचा छावा! पण तसे काही त्रास न देणारे. आमच्या अंगावर एकदा सुद्धा भुंकले नाहीत ते कुत्रे! 'चुगू'ला तर पहाटेच्या काळोखात 'संडास'ला जाताना सोबत केलीन् मला. आयुष्यात कुत्र्याजवळ इतकी सलगी प्रथमच केली. नाहीतर कुत्रा म्हणजे माझी घाबरगुंडी. इथे माझी मैत्रीच झाली त्यांच्याशी. 'होरे' पासून हे दोन कुत्रे तर आमच्याबरोबर 'मानस परिक्रमे'ला आले. जणू आमचे पहारेकरीच! वाटेत एकदा त्यांनी सशाची शिकार साधली, हरणाची मात्र त्यांना साधली नाही. अर्थात् हे दुर्मिळच प्राणी. 'द्रिऊँकाग्या' या, सरोवराच्या वाटेवरच्या, बुद्ध देवळाजवळ एक 'कस्तुरीमृग' पाहायला मिळाला होता.

मला भेटलेल्या ह्या भल्या-मोठ्या लांडग्यासारख्या कुत्र्यावरून मला एक लहानशी कविता स्फुरली –

म्हातारे म्हातारे कुठे चालली ?
कैलास मानसला मी रे चालली

त्यावर 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक्' या गोष्टीतल्यासारखं मी भिऊन म्हटलं –

आठ दिवस जाईन; दर्शन करून येईन
मग तू मला खा !
नाही नाही म्हातारे – असं का म्हणतेस ?
मी नाही की तो गोष्टीतला लांडगा
दिसत असलो जरी अंगाने दांडगा
अग, मी आहे एक, या पहाडांतला कुत्रा – 'इमानी कुत्रा !'

मी –

"मग कां रे बाबा चौकशी अशी ?
वाटेत अडवून – अशी तशी ?"

तो –

अग, नाही तुला मारणार – नाही तुला खाणार !
यात्रेला ऐसपैस ये तू जाऊन
देवदर्शनाने पावन होऊन
वाट बघत मी असाच थांबेन
परतल्यावर तुझा चरणस्पर्श करेन
आयुष्यभर मी करीन तुला सोबत
आवडेल का सेवा, माझी साथसंगत ?

मी –

जरूर बाबा जरूर, येते मी जाऊन
प्रभू-सेवा करत मग, राहू दोघे मिळून !

बुद्धांच्या देवळात किंवा मठात आणि वाटेवर पण कुठेकुठे, निर्माण केलेल्या पूजास्थानी – लांबलांब, निरनिराळ्या रंगांच्या चिंध्या बांधलेल्या दिसत. काही ठिकाणी याकची शिंगेही असत.

संध्याकाळच्या वाटेत घोडेवाले 'मानस'च्या काठची तांबडी माती मुठीमुठींनी पुन्हापुन्हा उचलून घेत होते. तिच्यात औषधी गुण असल्यामुळे ते ती नेतात असं कळलं. आम्ही यात्रेकरूंनी वाटेतले, खूप वेगवेगळ्या आकाराचे व रंगाचे दगड जमा केले.

या वाटेवर एक प्रकारची वनस्पती अशी दिसली, जमिनीलगत जणू मोठ्या वाटोळ्या बाउलमध्ये फ्लॉवरपॉट सजवून ठेवलाय्! हिरव्या काळपट पानांवर, विटकरी फुले! जणू 'संजीव'ने बनवलेला फ्लॉवरपॉट! आमचा संजीव फुलदाण्या छान छान प्रकारे तयार करतो त्यांची आठवण झाली.

**भजने**

सामूहिक भजन करताना दिलीपची आठवण यायची. तो म्हणत असलेली 'ॐ त्र्यंबकाय विश्वेश्वराय' आणि 'ॐ शक्ति ॐ, ॐ ब्रह्मा ॐ,, ॐ विष्णू ॐ' हा जप आम्ही म्हणायचो. मी सांगायची. इतर म्हणायचे. सौ. माथुर पण एक शिवाचे भजन – 'डमडमडमडम डमरु बजाय' आणि बिपिन राधाकृष्णाचा जप छान सांगायचा. बिपिन एक प्रसिद्ध वकील, धार्मिक होता. असेच सुशील अगरवाल आणि त्याचे आईवडील पण धार्मिक. त्यांनी वाटेत एका ठिकाणी, आपल्या घरी असलेल्या मुलाचा व नातवाचा वाढदिवस, आम्हा सगळ्यांना, सुका मेवा देऊन साजरा केला.

ह्या 'अगरवालां'चा घोडा नेमका ठीक नव्हता. वाटेत दोनदा मानसपरिक्रमेवर ते पडले. एकदा तर पाण्यात पडल्यामुळे बुटांपासून सगळं ओलं झालं. या मानस परिक्रमेत सहासात वेळा पाण्यातून जावं लागतं. एक दोन ठिकाणी तर चांगल्या रुंद पात्रांतून, घोड्याचे पाय पूर्ण बुडतील इतक्या खोल पाण्यातून जावं लागतं. इथे घोड्यावर 'सावध' असावं लागतं.

**घोड्यावर बसणं!**

हो, घोड्यावर बसण्यावरून आठवण झाली. माझं घोड्यावर बसणं — गुजराथी ग्रूपला खूप ऐटबाज वाटायचं — म्हणायचे, 'तुम्ही अगदी ताठ, न घाबरता छान् स्वार होता — सहजपणे! जणू रपेटीची नेहमी सवय आहे.' हो, पण एकदोनदा घोड्यावरून पडणं देखील आम्ही दोघांनी अनुभवलं बरं का! ते तर जिवाशी गाठ आल्यासारखेच प्रसंग होते.

घोड्यावर जे खोगीर असतं — ते आमचे घोडेवाले घोंगडीचं किंवा दुलईचं करायचे. नुसतं बांधून — ते माझ्या घोड्याचं एकदा सैल बांधलं गेलं होतं. मला कसं कळणार? ते हळूहळू नकळत अलगदपणे थोडंथोडं घसरायला लागलं डाव्या बाजूला; आणि त्यामुळे मी पण कलंडायला लागले. 'अरे, अरे, ए हरजीत सिंग,' म्हणताना डाव्या बाजूला घसरगुंडीसारखी पण उजवा पाय रिकिबीत अडकलेला, तो ओढला गेला तर घोडा पण अंगावर पडेल! हे पण मागे घोड्यावर होतेच; हे अतिशय घाबरले. त्यांचा घोडेवाला गोविंदसिंग पण पटकन् मदतीला आला आणि सावधपणे दरीच्या बाजूला उभा राहिला मला पकडत! मी ओरडतच होते, "हरजीत सिंग! माझ्या उजवा पाय सोडव आधी! मला धरू नको, उजवा पाय सोडव! सोडव आधी!" आधी हरजीतही मनातून गडबडला होताच, पण त्यानेही शिताफीने माझा उजवा पाय रिकिबीतून सोडवला. तोपर्यंत मी आपली उलटी लोंबकळत होते. उजवा पाय वर टांगल्यासारखी! घोडेवाल्यांनी तत्परतेनं हुशारी केली म्हणून, नाहीतर दरीत गच्छंतीच होती. नंतर थोडा वेळ घोड्यावर बसायची भीतीच वाटली. छातीत धडधडत होतं. खोगीर सैल बांधल्यामुळे हे घोडेवाल्यांना चांगलेच ओरडले व नंतर रोज प्रथम खोगीर नीट बांधून घ्यायला लागले. म्हटलं, कैलासनाथा, तुलाच रे बाबा काळजी!

अशी ह्यांची पण एकदा गंमत झाली. माझा आणि ह्यांचा घोडा असे जोडीदार असल्यामुळे, माझा घोडा जाईल, तसाच ह्यांचा घोडाही पाठोपाठ यायचा. माझ्या काळजीमुळे, हे नेहमी शक्यतो माझ्या पाठीमागे राहायचे.

एकदा हे घोड्यावर बसत होते. एका रिकिबीत पाय ठेवला नी टांग मारून दुसरा पाय रिकीबीत ठेवणार, इतक्यात माझा घोडा पुढे चालू लागला, त्याबरोबर ह्यांच्याही घोड्याने एकदम चालायला सुरुवात केली, त्यामुळे हे आपले लंगडी घातल्यासारखे, एय् एय् करत, 'गोविंदसिंग गोविंदसिंग!' म्हणून भीतीनं ओरडायला लागले. दहा-बारा पावलं तरी लंगडी घालावी लागली ह्यांना. नशीबानं ह्यांची पकड पक्की होती म्हणून, नाहीतर भलताच प्रसंग ओढवला असता. अर्थात् गोविंदसिंग तत्पर होताच. त्याने लगोलग पकडून घोड्याला थांबवले, पण तेवढ्या अवधीत जी गडबड घाबरगुंडी उडाली ती काही विचारू नका. तेव्हापासून हे घोड्यावर प्रथम बसले की मगच मी बसून जायला सुरुवात करायची असा नियम ठरला. आता त्या दोन्ही गोष्टी आठवल्या की कमालीचं हसू येतं. पण त्यावेळी काय स्थिती झाली, ती आमची आम्हालाच माहीत! एकदोनदा असेच घोड्यांचे पाय दुमडले पण लगेचच ठीक झाले. एकदा ह्यांच्या घोड्याचे पाय कशाला तरी अडखळून घोडा पुढून बसल्यासारखा झाला, अर्थात् हे पुढे त्याच्या अंगावर घसरून पडले, तेवढ्यात घोडा सावरून धडपडत उठला, नि त्याचे डोके एवढ्या जोरात ह्यांच्या हनवटीवर आपटले की चांगलाच मार लागला. 'ठो दे रे ठो दे रे' म्हणतात, तशी जणू 'ठो' दिली दोघांनी एकमेकांना!

पण हे मात्र त्यामुळे दबकतच घोड्यावर बसायचे, नि उतारावर तर चक्क उतरायचेच नि पायी चालायचे.

एकदा असाच ह्यांचा घोडा पुढून खाली वाकला तेव्हा तर त्यांनी मिठीच मारली होती त्याच्या गळ्याला, लगेचच उठला घोडा, पण माझी हसताना मुरकुंडी वळली आणि ह्यांची मात्र बोबडी!

**स्वामिनिष्ठा घोड्याची**

पण ह्या मुक्या प्राण्याची, कायम लक्षात राहील अशी स्वामिनिष्ठेची एक घटना पण घडली. काय झालं – आमच्यापैकी एका कैलासयात्रीचा जादापणाच झाला. तिसऱ्या की चवथ्या दिवशी असेल, आमचं मुक्कामाचं ठिकाण जवळ आलं होतं. त्यानं आपल्या घोडेवाल्याजवळ खांद्यातली पिशवी धरायला दिलीन्. थोडी पावले गेल्यावर घोडेवाल्यानं ती हमालाजवळ दिली. कारण ठिकाण अगदी हांकेवर होतं. यात्रीला हे समजल्यावर, त्याचं माथं एकदम भडकलं, तो रागारागान त्याला घोड्यावर बसूनच बोलायला लागला. इतका बोलला, इतका बोलला – "तुला माहीत आहे का त्यात किती हजार आहेत ते? आणि

कॅमेरा, पासपोर्ट जर पिशवी गेली तर... शंभर रुपये तरी कधी पाहिले आहेस का?'' वगैरे वगैरे खूप! त्याचं माथं भडकूनच गेलं होतं. इतर जाणाऱ्यांना काही समजेचना! घोडेवाला निमूट ऐकून घेत होता. मधूनच सांगायचा प्रयत्न करत होता की, 'तसं काही होणार नाही. काळजी करू नका.' पण तो ऐकायलाच तयार नाही. अखेर त्याच्या रागाचा पारा इतका चढला, की त्याने हातातली प्रवासाची, धुण्याच्या काठीसारखी काठी, भाल्यासारखी धरून एकदम घोडेवाल्याच्या पाठीत घातली. त्याबरोबर इतका वेळ सारं सहन करणाऱ्या घोड्यानं एकदम जी लाथ हाणली मागे, नि आपण बाजूच्या चढावावर एकदम चढला व त्या यात्रीला त्याने खाली पाडले. आपल्या धन्याला त्याने दिलेली वागणूक त्या मुक्या प्राण्याला सहन झाली नाही. सर्वजण अवाक् झाले.

मग पुढील सगळे सोपस्कार झाले. यात्रीला औषधपाणी झाले. घोडेवाल्यानं घोड्याची समजूत काढली. पण डॉ. नी यात्रीला एक दोन एक्स्-रेज काढण्यासाठी पुन्हां 'धारचुल्या'ला पाठवले. पुढे जायला परवानगी नाकारली. १२ च्या कंपूबरोबर यायला सांगितले अशी अद्दल त्याला घडली.

पण तोही जिद्दी! नशिबाने हाडबिड मोडलं नव्हतं. योग्य ते उपाय करून, 'धारचुल्या'हून दिवस-रात्र चालून त्यानं आम्हांला पुढे मग गाठलंच. पण मुक्या प्राण्याची स्वामिनिष्ठा, धन्यांवर झालेला अन्याय सहन न होणं, हे पाहून सर्वांबरोबर तोही अवाक् तर झालाच. पण त्याला स्वत:च्या वागण्याचा पश्चात्तापही झाला. एका मुक्या प्राण्यानं मनुष्यप्राण्याला दिलेली ती समज पुष्कळच काही सांगून गेली.

# सुस्नात होय जग!

दोन सप्टेंबर गुरुवार. हा आमच्या मानस परिक्रमेचा दुसरा दिवस. अगदी छान समाधानात, तृप्तीत गेला. कालच्या अगदी उलट!

आरामशीर नऊ वाजता निघालो, तिथलंच एक बुद्धाचं देऊळ पाहून! चहा व उपमा – मी व 'योगिनी'ने केला होता – नास्त्याने पोटपूजा करून आम्ही उत्साहात निघालो. आज सर्वजण कालचा थकवा विसरले होते. कारण आज आनंद होता, 'मानस' मधल्या स्नानाचा! आज पवित्र तीर्थक्षेत्री आमचं स्नान घडणार होतं. साधारण दुपारी एक दीडच्या सुमारास, एक चांगली जागा बघून आमच्या गाईडने आम्हाला स्नानाला व जेवणाला थांबवलं.

स्वच्छ, सुंदर, नितळ निळ्या पाण्यात एवढ्या सोळा हजार फूट उंचीवरच्या अवाढव्य पवित्र सरोवरात आम्ही सुस्नात होत होतो. पाणी पहाटेसारखं अतिशय थंड नव्हतं. सुखावह गार होतं. साहू शकेल असं होतं. त्यामुळे मनसोक्त डुंबता येऊन स्नान करता आले. ॐ नमः शिवाय म्हणत आणि ॐ भूर्भुवः स्वः हा गायत्री म्हणत, सूर्याला अर्घ्य देत, पूजा करत आम्ही स्नान केले. या स्नानासारखं सुख नाही अशीच प्रत्येकाची भावना होती. पाण्यातून बाहेर यावसं वाटत नव्हतं. पाण्याचा तळ स्वच्छपणे दिसणारा. प्रदूषणरहित जलात आम्ही स्वतःला विसरून जात होतो. इतक्या उंच पहाडावर, इतका मोठा समुद्र – हे मानस सरोवर – निसर्गाच्या या किमयेला पुन्हापुन्हा वंदन करत, प्रभूच्या या आगळ्या दर्शनाचा लाभ आम्ही सर्वांनी घेतला. जन्माचं सार्थक झालं होतं जणू प्रत्येकाच्या! आमचं अहोभाग्यच!

स्नानानंतर प्रत्येकाला इतकं प्रसन्न वाटलं आणि पूर्ण समाधान वाटलं. तृप्त तृप्त वाटलं. खरं तर जे काही वाटलं, ते शब्दातीतच आहे. पण प्रत्येकाच्या चेहेऱ्यावरून ते ओसंडत होतं. बेलाची आणलेली चांदीची छोटी बिल्वपत्रं पूजेच्या वेळी तीर्थात सुस्नात करून घेतली. मग महिम्न स्तोत्र म्हटलं. ही पत्रं आता 'कैलास'ला वाहून त्याचं निर्माल्य म्हणून घरी सगळ्यांना द्यायची होती. कारण इथे प्रसाद असा कांहीच मिळणार नाही.

स्नानानंतर सगळ्यांनी भोजन केले. दुपारच्या वेळी स्नान केल्यामुळे असह्य थंडी वगैरे नव्हती. सर्व सुखदायक आणि आरामशीर होऊन मनाला शांती प्राप्त झाली. 'याचसाठी केला होता अट्टाहास', ते पूर्ण झालं.

तृप्त मनानं-आनंदानं गातगात मग पुढची मार्गक्रमणा, दुपारनंतर झाली आणि संध्याकाळी म्हणजे रात्री आठ वाजता 'झै-दी' या मुक्कामी आलो.

रात्री झोपण्यापूर्वी सर्वांनी भजन केले. आज भजनांत वेगळाच रंग भरला होता. 'योगिनी गांधी'ने आज दोन सुंदर भजनं म्हटली. ह्या तरुण मुलीशी माझी छान मैत्री जडलीय्. भाव ओतून म्हणण्याच्या तिच्या वृत्तीमुळे आणि त्यांतून 'राम रतन धन पायो' आणि 'ठुमक चलत रामचंद्र' यासारख्या गोड भजनांनी सर्वजण नादावली. त्या नादातच रात्री पौर्णिमेच्या चांदण्यात, कडाक्याच्या थंडीतही आम्ही मग सैर केली. त्या पूर्णचंद्राचं मानसमधलं प्रतिबिंब, हा एक अनोखा साक्षात्कारच होता. निळ्या पाण्यातला चंद्र खरा, की निळ्या नभातला ? तो दिव्य आनंद होता. इथलं हे स्वच्छ चांदणं पदरात वेचून घ्यावं, नी तसंच्या तसं घरी न्यावं अशी विलक्षण वेडी इच्छा झाली. ही रात्र सरूच नये, असं वाटत असतानाच मुक्कामाकडे परतावं लागलं.

दुसऱ्या दिवशी विश्रांतीचा दिवस होता. आरामशीर आठनतर एकेकजण उठले. मी तर भलतीच 'फ्रेश' होते. कारण झोपही मस्त लागली होती. ह्यांची मात्र तब्येत जरा नरम होती. थोडा खोकलाही येत होता. काल जरा चूक झाली ह्यांची. 'मानस' आंघोळीनंतर फोटो वगैरे काढत बसल्यामुळे त्या नादात, लगेच गरम कपडे अंगावर चढवले नाहीत, त्यामुळे वारं लागून तब्येत नादुरुस्त झाली. थकवा आला. पण आज विश्रांतीचा दिवस असल्याने बरे झाले. दोघांचीही तब्येत जेव्हा जेव्हा बरी नव्हती, त्या दोन्ही वेळेस विश्रांतीचा दिवस असणे ही देखील 'शिवाची'च कृपा नव्हती का ? त्यामुळे हे आराम करू शकले.

आज इथे जवळच राहाणारा एक माणूस आला होता. थोडीफार माहिती देत होता. इथलं प्रमुख खाणं म्हणजे रोटी आणि सब्जी. आट्यामध्ये सोडा घालून रोटी बनवतात. आणि इथला जाडा तांदूळ नीट शिजत नाही, म्हणून जास्त पाणी घालून आम्ही 'खीर' बनवतो. इथल्या सरोवरांतले मासे, भरतीच्या वेळी किनाऱ्यावर येतात व मग मरतात. ते घरी नेऊन टांगून ठेवतात व त्याचा औषधी उपयोगच जास्त करून करतात. फारसे कुणी मासे खात नाहीत. येथे भूर्जपत्र नाही.

# डोळ्यांचे पारणे फिटले

## कैलास दर्शन

चार सप्टेंबरच्या शनिवारी संध्याकाळी बसनं 'तारचेन'ला आलो आणि 'कैलास' परिक्रमा केलेली सर्वजण 'हौरे'ला गेली होती – 'मानस'साठी! उद्या पाच तारखेला आम्ही 'कैलास' परिक्रमेला निघू. हे मात्र येणार नाहीत. ह्यांची तब्येत ठीक नाहीये, थंडीपण वाढलीय् आणि पाऊसही सुरू झालाय्.

सकाळी लवकर उठून कठीण प्रवासाला सगळे सज्ज झालो आणि 'याक' येण्याची वाट पाहात राहिलो. ज्यांना पायी जायचे नसते त्यांना इथे 'याक' वरूनच जावे लागते. घोडे जात नाहीत. याक म्हणजे रेड्यासारखा पण बुटका व लांबबलचक पाठीचा प्राणी. अतिशय केसाळ. निसर्गनिच जणू थंडीपासून रक्षण करण्यासाठी ही व्यवस्था केली असावी. नैसर्गिक स्वेटरच त्यांच्या अंगावर चढवून ठेवलाय्. हे याक मात्र आपल्या लहरीने जात असतात. घोडेवाल्यासारखा माणूस इथे उपयोगी पडत नाही. काही वेळा याकवरून पडायलाही होते, पण त्यांची उंची फार नसल्यामुळे तसे लागत नाही. शिवाय घोड्यासारखा ह्याला धरायला लगाम वगैरे नसतो.

याकमेन व गाईड खूप उशीराने जवळजवळ साडेआठला आले आणि हवा ठीक नाही, पाऊस आहे व कैलासवर बर्फही खूप आहे व ढग आहेत. त्यामुळे परिक्रमेला आज निघता येणे शक्य नाही असे म्हणाले.


सर्वांची निराशा झाली, पण करतो काय? मग तिथूनच 'कैलास' दर्शन घ्यायचे ठरले. आम्ही तर पायथ्याशीच होतो कालपासून.

आता उद्या परिक्रमेला निघायचे म्हणजे तीन दिवसाचा मार्ग दोनच दिवसात आटोपून परस्परच 'तकलाकोट'ला जाण्यासाठी निघावे लागेल. तोही बस प्रवास सहा-सात तासांचा आहे. त्यामुळे मीही परिक्रमेचं मनातून काढून टाकलं. इथूनच कैलास एन्जॉय करू. सगळा दिवस मग मोकळाच होता, पण थंडी भयंकर वाढत होती. पाऊसही होताच. ह्यांनाही अशक्तपणा वाटत होता. औषध व व्हिटॅमिनच्या गोळ्या दिल्या.


सहा सप्टेंबरला सोमवारी मग बाकीचे काहीजण – फक्त नऊजणच परिक्रमेला निघाले. दुपारी बारा वाजता आम्ही उरलेल्यांनी बसने दहा



याकचा कळप



गाला व सिरखा या वाटेवरची पहाडी शाळा



सरोवर प्रदक्षिणेला साथ करणारा सिंहाच्या छाव्यासारखा दिसणारा पहाडी कुत्रा



पहाडातील लाल टपोऱ्या दाण्यांचे कणीस, अत्यंत मोहक पण विषारी.
शंकरानं पचवलेलं हे विष तर नाही ?

किलोमीटरपर्यंत जाता आले तेवढे जाऊन आधिक जवळून 'कैलास'चे दर्शन घेतले. तेवढ्या वेळात नशिबाने पाऊस वगैरे नव्हता, हवा स्वच्छ होती. त्यामुळे दर्शन छान मिळालं. फोटोही काढता आले.

मुख्य कैलास पर्वत बर्फाळलेला. त्याच्या डाव्या बाजूला थोडेसे खाली थेट अगदी पिंडीसारख्या आकाराचा भाग. अगदी साळुंका सुद्धां! कैलासचे देऊळ वगैरे नाही आणि प्रत्यक्ष या एकोणीस हजार फूट उंचीच्या केवळ बर्फमय पर्वतावर, कुणी जाऊच शकत नाही. त्याला बाजूनेच फक्त प्रदक्षिणा करायची. 'याक'शिवाय कोणी प्राणी इथे जात नाही. म्हणूनच मला वाटते शंकराचे वाहन याक म्हणजे 'नंदी' हे झाले असेल.

तीन वाजता आम्ही बसमधून परतलो. मग 'रेणू'ने (एअरहोस्टेस) विमानातल्या पाकीटाचा तयार मटारभात गरम करून दिला व माझ्या लिंबाच्या लोणच्याबरोबर आम्ही तो खाल्ला. इलेक्ट्रॉल घेऊन हे झोपले कारण तब्येत अजूनही ठीक नव्हती.

**मोत्यांचा पाऊस**

दुपारी ऊन छान पडले होते. सौ. माथुर आमच्या खोलीत गप्पा करायला आल्या होत्या. त्यावेळी मोठी गंमतच पाहायला मिळाली. बघता बघता आभाळ झांकाळून आलं नि छोट्या छोट्या, साबुदाण्याएवढ्या बर्फाच्या मोत्यांचा भराभर पाऊस पडायला लागला. अग बाई, हे एवढे मोती कुठून घरंगळताहेत? स्वर्गातल्या 'इंद्रायणी'च्या गळ्यातला अनेकपदरी नाजूक मोत्यांचा हार तर तुटला नाही? आनंदानं बाहेर येऊन बघेपर्यंत, बर्फाच्या छोट्या मोत्यांचा गालिचा जमिनीवर अंथरला गेला. मोठ्या थोरल्या 'कुत्र्याच्या' अंगावर बर्फमोत्यांची शाल पांघरली गेली. आम्ही पण ते बर्फमोती बशीत गोळा करून खाल्ले. कुणीतरी तेवढ्यात येऊन सांगितलं होतं की, ते औषधी असतात म्हणून. 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' करत मी व उत्तरा आनंदातिशयाने बशी हातात घेऊन गिरक्या घेत राहिलो. ह्या निसर्गाच्या अनोख्या सुंदर खेळांत सामील झालो. खेळतां खेळतां कुणीतरी आउट व्हावं, तसा नकळत बर्फमोत्यांचा टपाटप मोठा पाऊसच सुरू झाला. बर्फमोती अदृश्य झाले नि आम्हाला खोलीत यावं लागलं, पण हे मोत्यांचं विलक्षण दृश्य कायम आठवणीत राहील. पुण्याला गारांचा पाऊस पाहिला होता, पण हे मोती काही वेगळेच. नभांतून साबुदाण्यांचं झुरुमुरु ओघळणं अनोखंच!

**हिंडणे, खाणे, गाणे-स्तोत्रे**

दुसऱ्या दिवशी सकाळी मग आसपास थोडे हिंडून आलो. हवा जरा उघडली होती. परतल्यावर हे, मी, उत्तरा आणि सौ. माथुर अशा चौघांनी बरोबर असलेले पूजा साहित्य घेऊन, अंगणात दगडाचे शिवलिंग करून कैलासची व त्याची यथासांग पूजा केली. अर्घ्य देऊन संध्येतली चोवीस नावं घेतली. हे पुरोहित झाले होते. मग गायत्री मंत्र, सुपारीचा गणपती, बाकीची पूजा, ध्यान! महिम्न, तांडव स्तोत्र मी म्हटले, नंतर सुक्या मेव्याचा नैवेद्य दाखवला. कैलासचे दर्शन उन्हात स्वच्छपणे झाले आणि मन समाधान पावले. तेवढ्यात किंचित् वर्षा सुरू झाली. जणू 'वरुण' राजा लिंगावर अभिषेक करून आम्हाला आशीर्वाद देत होता.

जेवणाच्या वेळेपर्यंत आज इथे बारावी बॅच – शेवटची – आली होती. त्यांनी व आम्ही मिळूनच खिचडी बनवली. चारसहा परदेशीय पाहुणेही आमच्यात जेवायला आले. खिचडीबरोबर दिलेली माझी उडीद डाळीची कोरडी चटणी सगळ्यांना खूप आवडली. त्या परदेशीयांनीसुद्धां पुन्हा पुन्हा मागून घेतली. श्री व सौ. जोसेफबरोबर एक फोटो काढून घेतला.

संध्याकाळी 'पुरुषसूक्त' व 'रुद्र' म्हणून होता होता. अचानकपणे आमच्या गटाचे कैलास परिक्रमेला गेलेले लोक परत आलेले दिसले. खरे ते उद्या येणार होते. मग समजलं की, पहिला मुक्काम 'दिरेबू' इथूनच त्यांना अत्यंत खराब हवामानामुळे परतावे लागले. 'डोलमा पास'ला ते जाऊच शकले नाहीत.

आपली घरचीच माणसं सुखरूप आल्यासारखा आम्हाला आनंद झाला. एवढी थकली होती सर्व. त्यांचं स्वागत करताना आमची धांदल उडाली. त्यांना चहा, खिचडी करून दिली. माझ्याजवळचा गुजराथी खाखरा, लिंबू लोणचे व चटणी दिली. मी आणलेली 'चिक्की' तर सर्वजण आवडीनं खाताहेत. आज केलेल्या पूजेच्या सुक्यामेव्याचा प्रसादही दिला. त्यांची प्रदक्षिणा अपुरी राहिली म्हणून साहजिकच त्यांना वाईट वाटत होतं. पण मी म्हटलं, 'अग, शिवलिंगाला नाहीतरी आपण पूर्ण प्रदक्षिणा घालतोच कुठे? तुम्ही तसंच केलय्, त्याबरोबर त्यांना बरं वाटलं. सबंध यात्रा पायी केल्याबद्दल, 'योगिनी गांधी' व 'सिलू' ला – 'साधना सोदी'ला – आणि पुरुषांमध्ये रघु रंगनाथन्, श्रीनिवासन् व पंडूस्वामी ह्यांना बक्षिस मिळाले. कैलास दर्शन आम्ही 'तारचेन'हून निरनिराळ्या कोनांतून घेतले. ही कैलास परिक्रमा, एकूण अशक्य नसली तरी कठिणच. जिद्द हवी त्याबरोबर नशीब आणि निसर्गाची साथ हवी हेही खरेच. शिवाय शेवटच्या बॅचेसच्या वेळी पाऊस, थंडी, बर्फ ह्यांचाही जोर असतो.

# सौंदर्याचे निरोप घेतां...

## मुख्य यात्रा पूर्ण झाली!

मुख्य यात्रा पूर्ण झाली, अवघड खडतर असूनही झाली, या तृप्तीत, आठ सप्टेंबरच्या बुधवारी आम्ही 'झै-दी' साठी निघालो. तिथे मानसचा 'अ' गट आमच्या स्वागताला सिद्ध होताच. 'नूडल्सचा' समाचार तिथे घेऊन, एकमेकांना गळामिठी घालत, मग सर्व मिळून 'कैलासनाथ की जय' च्या गजरांत, त्याचा निरोप घेत, 'मानस'ला लवून प्रणाम करत, बसने तकलाकोटला निघालो. प्रत्येकाच्या जन्माचं जणू सार्थक झाल्याच्या आनंदात सर्वजण उत्साहात होते.

तकलाकोटच्या आजच्या संध्याकाळच्या 'पूर्ण' जेवणावर, सगळ्यांनी यथेच्छ ताव मारला. सात दिवसांनी, संपूर्ण चांगलं जेवण मिळत होतं. शिवाय आज 'आयतं' जेवण मिळालं होतं. दमून थकून आल्यावर स्वत: बनवायचं नव्हतं. जेवणानंतर फळं खाऊन सगळे तृप्तावले. मग कुणी गावात थोडं हिंडून आले. अंगणात खूप वेळ गप्पा झाल्या. त्या गप्पात, आमच्या गटानं, पौर्णिमेच्या रात्री केलेली चंद्र प्रकाशातली 'मानस' जवळची सैर नि तो डोळ्यात जपून ठेवलेला पूर्णचंद्र, पुन्हापुन्हा अवतरत होता. सगळे खूष होते.

गुरुवारी मग बसने, खूप लांब अंतरावरच्या टेकडीवर असलेले 'खोजरनाथ' हे देऊळ बघायला गेलो. वाटलं होतं बुद्धाचं असेल, पण आश्चर्य म्हणजे, 'सीता-राम-लक्ष्मण'च्या चांगल्या उभ्या मूर्ती – आणि त्याच्या शेजारी बुद्धाचं मंदिर! हिमालयातल्या या 'रामराजा'च्या मंदिराचा काही इतिहास किंवा कथा मात्र कळू शकली नाही. एक 'काळीमाता' व 'महांकाळ' चे मंदिर होते. जिथे स्त्रियांना मज्जाव होता. इथल्या देवळाला आपल्यासारखा कळस नव्हता.

## बर्फ-बर्फ-बर्फ

संध्याकाळी सर्वजण बसने बाजारात खरेदीसाठी गेले. दुसऱ्या दिवशी येथून 'लिपूलेख'ला कूच केले. आज बर्फ पडायला सुरुवात झाली होते. वाटेतही बर्फ! ठाण्याहून निघताना हे म्हणाले होते, 'बर्फावरून जायला मिळाले पाहिजे.' मी 'नको नको' म्हणत होते. मला बर्फाच्या रस्त्याची भीतीच होती. ह्यांची हौस आज फिटली. खरं म्हटलं तर प्रत्येकाची अगदी 'जिरली' असंच म्हणायला पाहिजे. कारण हा बर्फातून प्रवास कठिण आव्हानात्मक होता. जायचा रस्ता

खिंडीतून नि आजूबाजू पूर्ण बर्फमय. दिशा देखील कळत नव्हती. बर्फावरून पाय घसरत होते. मधूनच पाय व हातातली काठी रुतायची. वाट तर कळतच नव्हती. मला तर खूपच धडकी भरली. कसं काय या बर्फात निभावणार? प्रत्येकाचीच अवस्था तशी कठीणच झाली. सरहद्दीवर आलेलो होतो. ही बर्फाची उद्भवलेली परिस्थिती पाहून, आपल्या हद्दीतले, प्रत्येकाचे घोडेवाले ज्याच्या त्याच्या मदतीला आले, शिवाय लष्कराची माणसंही सज्ज होतीच. माझ्या जीवात जीव आला. नाहीतर वाटलं होतं निरोप घ्यायचीच वेळ आलीय्. त्या क्षणी सगळ्यात धाकट्या नातवाची मूर्ती डोळ्यांसमोर आली. म्हटलं 'टिमटॉम, (हे मी ठेवलेलं त्याचं लाडकं नांव) येते रे मी! तू, टिंगाटोळी, टिंबक्टू टिंगीडिक्की, आणि तनू-सोनू (ही पण मीच बाकीच्यांची ठेवलेली लाडकी नावं) एकमेकांना लागून, सांभाळून राहा हं. खूप मोठे व्हा.''

आणि त्याच वेळी ह्यांचा निरोप घेण्यासाठी, पाठीमागे वळून बघण्याचीसुद्धा ताकद नव्हती म्हणून नुसताच हात उंचावला आणि माझा तोल जाणार इतक्यात बर्फात घसरलेल्या मला सावरून धरत गोविंदसिंग म्हणाला, 'धीर धरना, घबराना मत' आणि दुसऱ्या काखेत लष्कराच्या माणसानेही हात घालून. दोघांनी जवळजवळ उचलूनच मला, वरपर्यंत त्या खिंडीत आणले. तिथे पुन्हा ते जीवघेणं थांबणं, घोडे बदलणं, सामान या घोड्यावरून त्या घोड्यावर लादणं! विश्रांतीला बसायलाही जागा नव्हती बर्फच बर्फ असल्यामुळे! एकमेकांच्या खांद्यावर माना टाकत, एकमेकीला सावरत, आधार देत होतो. एकदाचे सोपस्कार झाले, आणि पुन्हा बर्फातून चालू लागलो, म्हणजे उतरू लागलो. थोडं अंतर गेल्यावर, घोड्यावर बसता आलं. पण जीव मुठीत धरूनच, कारण घोडे बर्फात केव्हा घसरणार नाहीत ना अशी उगीचच धास्ती होती. ती मुकी जनावरं, मधूनच घसरत असली तरी सांभाळून नेत होती.

काही वेळानं एकदाची ती बर्फवाट संपली; पण ती संपेपर्यंतचा प्रवास म्हणजे एक 'दिव्य'च होते. विलक्षण अनुभव होता हा. ते 'एव्हरेस्ट'वाले कसे गेले असतील? शाबासच त्यांची!

### भारताच्या हद्दीत परत आलो

आपल्या भारताच्या हद्दीत आलो नि जरा सुटकेचा नि:श्वास टाकला. मनात आलं – मुख्य यात्रा यशस्वी झाली. या वयात सुद्धा! आता पुढच्या प्रवासाचं काही एवढं वाटणार नाही, जरी पहाड उतरायचे-चढायचे असले तरी 'नयी डांग', 'काला पानी', करत 'गुंजी'ला आलो. आणि गुंजीला एवढा पाऊस सुरू

झाला की बस्. गुंजी ते बुधी हा प्रवास अत्यंत साहसाचा असाच झाला. गेल्या दहा वर्षात पडला नव्हता, इतका पाऊस म्हणे! आमच्या अकराव्या गटाच्या वाट्याला नेमका आला. बुधी ते मालपादेखील हड्डी नरम होत जिवावर जणू उदार होत, 'शिवजी'वर भरवसा ठेवून आलो. त्यांनं सगळ्यांना तारलं मात्र!

**मजल-दर-मजल**

आता 'मालपा'हून 'सिर्खा'ला निघताना हवामान कसे राहाते ह्याची काळजी होती. कारण दोन दिवसाच्या कष्टमय प्रवासानं सगळ्यांना दम निघाला होता. शिवाय रात्री अतोनात थंडी होती. पण घोडेवाले मात्र खात्रीने म्हणत होते की, 'आज सूर्य वर येईल. आजचा प्रवास त्रासाचा नाहीये.' म्हटलं, ह्यांच्या तोंडात साखर पडो बाबा! आणि खरंच तशी चिन्हं दिसायला लागली. हवा छान झाली. हळूहळू प्रकाशाची चाहूल लागली.

सुरुवातीला बरेचसे पायी चाललो आणि मग घोड्यावरून रपेट सुरू केली. मागच्या वेळचं, 'सिमखोऱ्या'चं हॉटेल व पोस्टऑफीस पुन्हा लागलं. पोस्टमास्तर ओळखीनं वाट पाहात होता. याही वेळी पुण्याला 'भाई'ला लिहिलेलं पत्र त्याच्याजवळ टाकायला दिलं. मागच्या वेळी लाल मिरचीच्या चटणीबरोबर काकडी खाल्ली होती. यावेळी त्यानं मक्याच्या कणसानं पाहुणचार केला.

**जिरुमाला**

आज इथे पहाडी बायकाही बऱ्याच दिसत होत्या. एकेकीच्या गळ्यात एक वेगळाच छानदार प्रकार दिसला, चिंचपेटीसारखा तो प्रकार होता. खसखशीएवढ्या रंगीबेरंगी मण्यांच्या तिरकस विणीचं ते डिझाईन, योग्य रंगसंगतीनं फारच खुलून दिसत होतं. 'जिरुमाला' म्हणे नाव त्या मालेचं! माझं मन गेलं त्यावर. एखादी कोणी देते का विकत गळ्यातली काढून म्हणून विचारलं; पण कुणीही तयार होईना. एक तर त्यामागे बहुधा 'मंगळसूत्रा' प्रमाणे भावना होती नी ती विणायला अतिशय कौशल्य नि मेहनतही लागते म्हणे, 'पुढे तुम्हाला 'घारचुल्या'ला मिळेल कदाचित्' असं सांगण्यात आलं. पण मन जडलेली ती 'जिरुमाला' काही मिळाली नाही 'घारचुल्याला'सुद्धा.

आजचा प्रवास खरंच सुखाचा झाला 'रंगलिंग टॉप' या सुंदर विश्रांतीच्या ठिकाणी सगळेजण थांबले. बसायला सुंदर वक्राकार कट्टा. जाताना, दहाव्या गटाची परतणारी पुण्याची माणसं इथेच भेटली होती. आज सगळा कट्टा माणसांनी भरून गेला. सगळ्या घोडेवाल्यांसकट जवळ उरलेले भाजलेले भुईमूग

दाणे, मुठीमुठीने वाटून टाकले. सगळ्यांनी इथे फोटोपण खूप काढले. 'बिपिन', 'सुशील', 'सुरभि', सौ. माथुर, योगिनी या सगळ्यांचे फोटो मला काढायचे होते, ते मिळाले. खूप गप्पा करून, मजा करून, आराम केला या जागेवर आणि आनंदात पुढे निघालो. यात्रा यशस्वी झाल्याच्या मूडमधे सगळे होते. कारण आता एकदा 'पांगु'पर्यंत गेलं की मग बसनंच प्रवास होता. पांगु तसं आता हाकेवर होतं. कुणालाच कल्पना नव्हती की अजूनही एका दिव्यातून जायचंय.

**परतीच्या वाटेवर गाणी**

गाणी गात निघालो आणि थोड्याच वेळात एक छोटसं पहाडातलं हॉटेल लागल आणि आश्चर्य म्हणजे, कोबीची गरमागरम भजी मिळाली तिथे! अर्थातच मग 'रंगलिंग टॉप'वरचे सगळेच यात्री एकापाठोपाठ एक तिथे भज्यांवर ताव मारायला आले नी नैसर्गिक तयार पाणपोईतलं पाणी त्यावर पिऊन तृप्त झाले. आणि अधिकच उत्साहानं पुढची वाट चालून मुक्कामावर – सिरखकिम्पवर – आले. तिथून तसेच छानपैकी पुढेही 'धारचुला' या मुख्य ठिकाणी आलो. वाटेत 'तवाघाट'ला – जिथून मुख्य यात्रेचा चढणीचा प्रवास सुरू होतो – त्याठिकाणी सुरेख जिरा-भात व भरपूर ताक जेवणात मिळाले. अहो त्या ताकाची काय गोडी सांगू? अहो, पूर्ण महिनाभरात दही-ताक मिळाले नव्हते. त्यामुळे खरंच ते ताकही अमृताप्रमाणेच सगळ्यांनी मनसोक्त घेतले.

**'माझिया माहेरा जा!'**

'धारचुल्या'त तर सगळेच भलतेच मोकळेढोकळे झाले होते. इथून एक मधली मोठी नदी पुलावरून ओलांडली की 'नेपाळ'. सगळ्यांनी आज तिथे जाऊन खरेद्या तर केल्याच पण आपापल्या घरी फोन करून, 'यात्रा' पार पाडून सुखरूप परतल्याचं कळवलं. घरच्यांचे आवाज ऐकतांना – काय एकेकाचे चेहरे प्रफुल्लित होते. पलीकडेही आनंद होता आमचा आवाज ऐकण्याचा!

दुसऱ्या दिवशी शनिवारी शेजारच्याच 'हनुमान' मंदिरात बलभीमाचे दर्शन घेऊन बसने 'कौसानी'साठी प्रयाण केले. जाता जातां इथल्या देवळातल्या एका सुंदर कमळाएवढ्या आकाराच्या जास्वंदीच्या फुलाच्या झाडाच्या फांद्या आम्ही दोघांनी आणि 'बिपिन'ने घेतल्या.

**बसची परवड**

वाटेनं येताना मस्त 'भेंड्या' वगैरे सुरू झाल्या आणि काही अंतर गेल्यावर लक्षात आलं की बसला अडथळे येतायत्. रस्त्यांवर पडझड झालीय् आणि

अडखळत बस निघताना एका ठिकाणी समजलं की, गेल्या आठ दिवसात 'कौसानी' व आजूबाजूच्या पहाडात झंझावती पाऊस पडून रस्ते बंद झालेत. काही ठिकाणी तर पहाडच्या पहाड घसरलेत. उंच-उंच 'वृक्ष' समूळ कोसळून रस्त्यावर आडवे झालेत. 'बागेश्वर' पर्यंत कशीतरी बस आली, आणि मग तिथे मुक्काम करावा लागला आणि दूरच्या 'राणीखेत'च्या मार्गाने प्रवास करायचा ठरला. तिथलेही रस्ते धड नव्हतेच. लियाजन ऑफीसची आज परीक्षा होती. किती वेळ फोनाफोनी करून (फोनही धड लागत नव्हते) मग जितके अंतर बसने जाता येईल, तितके जायचे आणि मग पडझड झालेल्या रस्त्यावरून पायी जायचे ठरले.

एका ठिकाणी जिथे बस अडली – नेमकी दुपारी बाराच्या सुमारास – तिथून भर उन्हात सर्वांनी 'लेफ्ट-राईट' करत सुरुवात केली. जवळ जवळ आठ दहा किलोमीटर चालत आलो, साडेतीनला 'खैरना' या ठिकाणी. नदीकाठचं ठिकाण; चालून सपाटून भूक लागल्याने इथल्या तयारच असलेल्या डाळ-भात व काकडी-टोमॅटोवर यथेच्छ ताव मारला आणि त्यावर मुखशुद्धीला 'टूटीफ्रूटी'चा समाचार घेतला. असं हुश्श्! केलंय् सर्वांनी! मग आराम! कारण 'पाच'वाजेपर्यंत पोनी व पोर्टर्स सामान घेऊन येणार होते. पण दोन्हीही पाहिजे तेवढे-आडवाटेत न मिळाल्याने आठ वाजले तरी सामान आलेच नाही. सगळेच कंटाळले. पण करतात काय? शिवाय अंधार मी म्हणायला लागला. आता ह्यानंतर उशीरा निघून पुढे तरी बस सरळ जाणार का असा प्रश्न सर्वांना पडून, ज्यांची वीस तारखेची सकाळच्याच विमानांची किंवा गाडीची तिकिटं होती, त्यांना काळजी वाटायला लागली की, वेळेवर पोचलो नाही तर गाडी किंवा विमान चुकणार! पण इलाजच नव्हता.

जवळजवळ नऊ वाजता पोनी व पोर्टर्स आले. पण त्यांची स्थिती बघून जीव कळवळून गेला. कमी माणसांना सारं सामान पेलावं लागलं होतं. त्यामुळे अक्षरश: जमिनीपर्यंत वाकले होते ते भारांनी! जागी आल्यावर सारे मटकन् बसलेच. आम्हा साऱ्यांच्या डोळ्यात टचकन् पाणीच आले. आडवाटेत अनपेक्षितपणे बस अडल्याने माणसं पुरेशी मिळाली नव्हती. त्यांनी मात्र आपलं इमान राखलं होतं. त्यांना भरपूर बिदागी नी चहा-नास्ता दिला. मग सामान ज्याचं त्याचं बघून घेण्यात, बसवर चढवण्यात वेळ गेला. आणि रात्री पावणेदहाला भर काळोखात, अरण्यातून, तुटक्या-पडक्या वाटेवरून बस

निघाली. ऊर धपापत होता. वाटेत दगडांचे, मातीचे ढीग, आडवी आलेली झाडं. शाबासच होती त्या ड्रायव्हरची! त्याच्या कौशल्याची! कौशल्य पणाला लावून, वाट काढत, सर्वांची शिरावर घेतलेली जबाबदारी पार पाडण्याची तो सारथी शिकस्त करत होता. बस टणाटण उडत होती, काही वेळा दरीच्या बाजूला झुकत होती, आणि मी नेमकी त्या बाजूच्या खिडकीत! वाटलं, हे झुकणं अति झालं, तर आपला अगदी 'चुरा' होणार. कारण आपल्या अंगावर बससकट सगळे पडणार. अक्षरश: आपण भरडणार. पुन्हा सगळी नातवंडं मनासमोर लकाकून गेली. 'मानस'चं एवढं ९ लिटर आणलेलं पाण्याचं तीर्थ द्यायचं होतं ना सगळ्यांना! पण त्या आधीच वेळ भरली बहुतेक!

**किती अंत पाहसी!**

पण देवानं म्हटलं, नाही, अजून निरोप द्यायची वेळ नाही. आणखी एका अवघडात अवघड परीक्षेतून पार पडायचंय्. म्हटलं, "बाप रे! देवा, बर्फातून आलो गुडघ्यापर्यंतच्या, दहा वर्षात पडला नव्हता, इतक्या पावसातून, थंडीतून आलो. धडाधडा वाहाणारा धबधबा दोनदा पार केला, पहाड पडले, म्हणून कितीकिती चालत आलो, आणि अजूनही परीक्षा बाकी आहे?"

"मग? उपास होत नाहीत ना तुझ्याच्यानी, दे आणखी एक परीक्षा." इतकं होईपर्यंत, 'खर्रक्' 'खर्रक्' करत गच्कन् बस अडकली. तिला पुढे जाणं शक्यच नव्हतं. रस्ता बंद झालेला! आलीया भोगासी असावे सादर! रात्री साडेअकराच्या त्या किर्र काळोखात, समोरचं माणूस दिसेना. इतक्या काळोखात, बॅटऱ्या अवघ्या चारपाचच! कारण आता बसचा प्रवास म्हणून सगळ्यांनी आपापल्या बसवरच्या सामानात टाकलेल्या. कित्येकांनी बूटही काढून, पायांत चपला चढवलेल्या. सलवार खमीस ठेवून देऊन धारचुल्यालाच आम्ही काही जणींनी साड्या पहनलेल्या! एवढ्याशा त्या मिणमिणण्यांत मग पोर्टर्सच्या मदतीनं, काळोख फाडत उंचसखल भागांतून परीक्षा सुरू! घसरडं झालेलं, अरुंद पाऊलवाट – खरं म्हणजे वाट अशी नव्हतीच, एका बाजूला पडका पर्वत, खोल नसली तरी दुसऱ्या बाजूला नदी. असे धडपडत सांखळी केल्यासारखे एकामागोमाग एक निघालो. कुणी मधेच घसरत होतं, कुणाच्या हातांतलं सामान पडत होतं. कुणाची काठी निसटत होती. अखेर धोका ओळखून पोर्टर्सनी आजूबाजूच्या गावातल्या लोकांना व लष्कराच्या लोकांना बोलावून आणलं. आणि त्यांनी आम्हाला रस्त्यापार केलं. एकदा कुणी म्हणालं,

खालच्या वाटेनं नका जाऊ. खूप अरुंद नि धोका आहे. वरच्या बाजूनं या. सारे मग पडलेली झाडं चुकवत, उलटे परत मागे आलो. अर्धे गेलो नि पुढे एकदम इतका उतार आला की गच्छन्तीच! पुन्हा वाटाड्यांनी परतवलं. ''चला चला मागे फिरा – पहिलीच वाट बरी!'' मग परत अबाउट टर्न! आता मात्र रडकुंडी झाली. पण करतो काय? पुन्हा एकदा 'करू मी कशी?' तसं, 'चालू मी कशी? चाललंच पाहिजे.' जिवाच्या आंकांताने एकेक पाऊल पडायला लागलं. गावकरी आणि लष्कराचे शिपाई होते, म्हणून खाचखळग्यांचा, दगडांचा, घसरणीचा नि पडलेल्या पहाडांचा तो भाग पार पडला.

**सुटलो? छे! अजून नाही!**

सुटलो एकदांचे म्हणत तिथेच थांबलो. काहींनी तर बसकणच मारली. एकदोन बसेस काही अंतरावर उभ्या दिसल्या. मी आधारासाठी तिकडे धांवले. आणखीही कुणी आलं. पण हाय रे दैवा! ती आमची बस नव्हती. मग धापा टाकत काठ्यांच्या आधाराने उभे राहिलो. आमच्यामागून आलेलं सामान बघून घ्यायचंच होतं. ते सोपस्कार झाल्यावर एकदाची आमची बस कुठूनशी आली. सुटलेल्या कैद्यांसारखी माणसांनी 'धूम' ठोकली बसकडे! आणि बसले एकदाचे ठाण मांडून सगळेजण! आता ही बस सरळ शेवटपर्यंत जाईल ना? वाटेत उतरावं लागणार नाही ना? गाड्या-विमान चुकलं तरी चालेल – पण थेट दिल्ली गाठू ना? 'बहोत दूर' असलेली?

बसू या तर खरे आता. रात्रीच्या बाराला ती बस निघाली. दमलेले निःश्वास टाकले गेले. आणि सलग साडेतीन तास आरामात झोपून साऱ्या यात्रींनी तो प्रवास भोगला, सारथ्यावर विश्वासून; भार टाकून! मी आपली घोड्यावरून जाताना, घोड्याला आधी कुरवाळायची – 'नीट न्यायचं हं राजा' म्हणायची आणि 'जय देवा, जय देवा, जय अश्वदेवा' अशी त्याची आरती करायची. आता बसमध्ये बसल्यावर 'जय देवा, जय देवा, सारथ्या देवा' म्हणत – श्रीकृष्णाला विनवायची, की तुझं सारथ्य त्यांच्यात उतरव रे बाबा! उदारधी आणि भक्तांचा भुकेला श्रीकृष्ण ती विनवणी ऐकायचा नी आम्हाला दरवेळी तारायचा.

एकेक वेळ मनात यायचं, कुणी विचारलं तर सांगावं – नका प्रयत्न करू कैलास यात्रेचा! पण ते तेवढ्यापुरतंच. असं साहस अनुभवायलाच हवं. गोडाची मजा कळण्याकरतां, तिखटानं जीभ भाजलेली असायला हवी.

# मेरी प्यारी जन्मभूमी

पूर्ण साडेतीन तासांनी, पुन्हा सगळ्यांना झोपेतून खडबडून जागं करून, 'गजरौला' या ठिकाणी चहा सॅन्ड्विचेस दिले. काल रात्री जेवण नव्हतंच की झालेलं! मग हलके होऊन पहाटे जे निघालो पुन्हां ब्राह्ममुहूर्ती, ते अगदी शेवटपर्यंत सरळ असलेल्या रस्त्यांनी दिल्लीत प्रवेशते झालो – ठीक साडेसातला.

त्यापूर्वी दहा मिनिटे, आम्ही दोघांनी बसमधेच उभं राहून भारतमातेची,

'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे'

ही प्रार्थना सर्वांच्या वतीनं म्हटली. भारत मातेचा मानबिंदू, जगाचा मानदंड असा महामेरु औषधी कैलास, वेदांतला 'मेरुपर्वत', त्याला व ब्रह्मदेवानं निर्माण केलेल्या अतिप्राचीन 'मानस' तीर्थक्षेत्राला पुन्हा एकदा मानवंदना देऊन –

**जन्मोजन्मीची नाती**

तीस दिवसांच्या सहयात्रींनी, जड अंत:करणाने एकमेकांचा निरोप घेतला.

काही माणसं मनात रेंगाळत राहिली. त्यातली योगिनी, सुरभि, सौ. माथुर आणि सुशील व बिपिन हे मानसपुत्र.

'चौकोडी' या गावाला, परतीचं भोजन झालं. तेव्हा ह्यांच्याजवळ रुमाल नव्हता. ह्यांनी सहजपणे माझ्या छानदार साडीच्या पदराला चक्क हात पुसले. मी लाजत, कुणी बघत नाही ना पाहायला लागले. नेमका बिपिन गंमतीनं हसत पुढे आला, 'कांही हरकत नाही आन्टी, अग, सुरुवातीपासून तुमची जोडी पाहून मला सतत माझ्या आईवडिलांची आठवण येते. त्यांचं हसणं-बोलणं, वागणं, एकमेकांना साथ देणं, थेट तुमच्यासारखं! आपलं हे जडलेलं नातं कायम ठेवायचं हं, बाऽऽय्!' माथुर म्हणत होत्या, 'तुम्ही प्रत्यक्ष स्नेहमूर्ती आहात.' योगिनी हात घट्ट दाबून स्पर्शांतूनच भावना व्यक्त करत होती. उत्तरा माझे डोळे अलगद पुसत होती आणि सुरभीनं तर चक्क गालांवर ओठ टेकले.

**भेटी लागी जीवा...**

मनाच्या गाभाऱ्यांतल्या या माणसाना सोडून जाताना, अवघडताना, सर्वांनीच एकमुखाने, 'जय कैलासनाथा'चा उद्घोष केला.

आता घरचीपण कमालीची ओढ लागली होती. तब्बल चाळीस दिवसांनी सर्वांच्या भेटी होणार होत्या. 'भेटीलागी जीवा लागलीसे आस' असं सर्वांनाच झालं होतं. चातकासारखी वाट पाहात असलेल्या मुलामुलींनी 'बॉम्बे सेंट्रल'वर उत्साहात 'जय शिवशंकर' करत, गळ्यात हार घालून स्वागत केलं. कॅमेऱ्यांनी पुन्हा पुन्हा 'क्लिक्' केलं. नातवंडांनी गच्च मिठ्या घालत, 'आजी किती वाळलीयस तू! काळीपण झालीयस्, सुरकुतलीय्स!, म्हटलं, "दादा, तुम्हीपण खूपच बारीक झालांत. किती थकलेले दिसतां!" सगळ्यांनाच कळलं होतं की, बरेच कष्ट झालेयत्. आमचं वजन तीन-चार किलोनी कमी झालं होतं. सगळ्याच यात्रेकरूंची ही स्थिती होती. आजारी कुणीच नव्हतं, पण शरीराची झीज मात्र बरीच झाली होती.

घरच्या गाड्यांतून ठाण्याच्या घरात प्रवेश केला. अंगणांतच स्वागताचा पाऊस पडला. आरती ओवाळली गेली. दूधपाणी पायांवर घातलं गेलं. आनंदाचा एकच गजर, जणू कांही आनंदाचं उधाण! आनंदाचा अनोखाच समारंभ साजरा होतांना आनंदसरी ओघळत राहिल्या. मन उचंबळून आली होती नि आनंदाचा धबधबाच अंगणांत पडत होता. काय करू नि काय नको असं प्रत्येकाला झालं होतं. आमचं एकत्र कुटुंब असल्यामुळे, तिघी जावा, पुतणे पुतणसुना, मानसपुत्र, मानससुना सगळ्यांची एकच गडबड घाई. या माणसांच्या श्रीमंतीनं, वैभवानं आम्हीदेखील पुन्हा मोहरून गेलो. आनंदाच्या या जल्लोषात, वर्षावात बरोबर आणलेलं 'मानसतीर्थ' प्राशन करून सर्वजण प्रेमानंदांत न्हाऊन निघत होते.


**गौरी परत आली!**

दीड दिवसाचा भाद्रपदांतला पाहुणचार घेऊन गणराजांनी कालच निरोप घेतला होता आणि गौरीमातेच्या आगमनाची हळदीची पावलं अंगणापासून देवघरांपर्यंत उमटली होती. प्रत्यक्ष 'मानस'काठच्या 'खड्या'च्या गौरी सासर माहेरसाठी माझ्यासवे आल्या होत्या. त्यांची प्रतिष्ठापना होऊन हिमालयाच्या पहाडांतूनच आणलेल्या शुद्ध मधाचा त्यांना नैवेद्य दाखवला.

प्रत्यक्ष कैलासहून 'हरा'सह आलेली मी ही 'गौर' – माहेरी खीर-पुरणाचा नैवेद्य घ्यायला सुखरूप परत आली म्हणून भावजया कडकडून आनंदमिठी घालत होत्या.

आनंदाच्या डोही आनंद तरंग उठत राहिले होते.

जिल्हा: पिथोरागढ़ (यु.पी.)




आदि कैलाश मार्ग दर्शक नकाशा

**KAILASH MANASAROVAR YATRI MANDAL, BOMBAY.**

2, DATTA KUTIR, PANDURANG WADI, 1st. ROAD,
GOREGAON (EAST) BOMBAY- 400 063.